शुक्रवार, 12 ऑगस्ट 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 18
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 12 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-18 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-8 ● PRICE-5




## विद्यापीठाचे डोके ठिकाणावर आहे का?

आधुनिक केसरी

औरंगाबादचे डॉ. बा. आं. म. विद्यापीठ म्हणजे थोर लोकांचा भोंदू जमाव झाला आहे का? अशी शंका येत आहे. परवा 6 ऑगस्ट रोजी विद्यापीठाने पदवी परीक्षांचे 'निकाल' लावले. यात शेकडो विद्यार्थ्यांच्या मार्क मेमोवर एक किंवा अनेक विषयांमध्ये शून्य ग्रेड पॉइंट दिले आणि विद्यार्थ्यांना नापास करण्यात आले.

त्याच विषयांमध्ये त्याच विद्यार्थ्यांना मागील सत्रात ए+ ग्रेड आहे आणि या सत्रात थेट शून्य ग्रेड! बरं बाकीच्या विषयातसुद्धा या सत्रात ए++ ग्रेड आहेत. मग विद्यार्थ्यांनी एकाच विषयाचा अभ्यास केला नाही असे समजावे का? यातील अनेक विद्यार्थ्यांना मी प्रत्यक्ष ओळखतो. त्यांना ज्या विषयात शून्य ग्रेड पॉइंट दिले आहेत त्या विषयाच्या अभ्यासात ते आतापर्यंत आघाडीवर आहेत. चांगला अभ्यास करतात. तरीही ते नापास कसे होऊ शकतात?

**परीक्षा भवनात या -कुलगुरू**

अशा अनेक संतप्त विद्यार्थ्यांनी 8 ऑगस्ट रोजी विद्यापीठावर मोर्चा काढला, घोषणा दिल्या. एबीपी माझा आणि दैनिक लोकमतने बातम्या लावल्या. कुलगुरुंना विचारणा केली. तेव्हा कुलगुरू म्हणाले, "विद्यार्थ्यांनी परीक्षा भवनात येऊन भेटावे, मार्क मेमोत सुधारणा होऊ शकते." म्हणजे लांबच्या विद्यार्थ्यांनी स्वतःची चूक नसताना पैसे खर्च करून विद्यापीठात का यायचे?

**परीक्षा भवनात येऊ नये**

नंतर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गणेश मंझा यांनी दैनिक लोकमतला सांगितले की, "विद्यार्थ्यांनी परीक्षा भवनात येऊ नये. मार्क मेमोमध्ये त्रुटी असतील तर आपापल्या महाविद्यालयांकडे तक्रार नोंदवावी आणि महाविद्यालये विद्यापीठाला ई मेल पाठवतील." यात कुठेही 'पुनर्मूल्यांकन' किंवा 'शुल्क भरावे लागेल' असे मंझा यांनी म्हटले नाही.

**शुल्क भरा; डबल गेम**

मात्र 10 ऑगस्ट रोजी विद्यापीठाच्या वतीने महाविद्यालयांना परिपत्रक पाठवून "पुनर्मूल्यांकन म्हणजेच रिकाउंटिंग व रिचेकिंग साठी विद्यार्थ्यांचे फॉर्म भरून घ्यावे आणि त्यासाठी विहित शुल्कही भरावे लागेल" असे लिहिले. म्हणजे चूक विद्यापीठाची आणि लूट विद्यार्थ्यांची? विद्यापीठाने दिलेल्या निकालात त्रुटी असतील तर त्याला विद्यार्थी जबाबदार असतात का? जेव्हा शेकडो-हजारो विद्यार्थी निकालाबाबत शंका व्यक्त करतात तेव्हा विद्यापीठाने स्वतःच्या 'गिरेबान'मध्ये एकदा तरी पाहायला नको का? सरसकट विद्यार्थ्यांकडून वसुलीचा धंदा करण्यासाठी विद्यापीठ सुरू आहे का? ज्या कर्मचाऱ्यांनी निकालात त्रुटी ठेवल्या असतील त्यांची चौकशी करून त्यांच्या पगारातून रिकाउंटिंगचे शुल्क वसूल करा की! मग बघा कसे अचूक निकाल लागतात! विद्यार्थी पुन्हा रस्त्यावर उतरण्याची वाट पाहू नका. इज्जतीने निकाल लावा. नाही तर तुमचा 'निकाल' कसा लावतात हे विद्यार्थ्यांनी अनेकदा दाखवलेले आहे.

**विनोद जैतमहाल, जालना**

## हर घर तिरंगा!



भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त देशभरात 'हर घर तिरंगा' मोहीम राबविण्यात येत असल्यामुळे यंदा तिरंगा ध्वजाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वाढती मागणी लक्षात घेता कारागीरांकडून अहोरात्र ध्वज निर्मितीचे काम केले जात आहे.

## दोन लाख सैन्य कपात होणार?

### वाढत्या पेन्शनचा भार कमी करण्यासाठी जूनमध्ये केली होती अग्निपथ योजना जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : भारत सरकार येत्या दोन ते तीन वर्षात भारतीय सैनिकांची संख्या दोन लाखांनी कमी करण्याच्या तयारीत असल्याची माहिती संरक्षण मंत्रालयाच्या सुत्रांनी दिली आहे. भारतीय सैन्याचे आधुनिकीकरण करण्याच्या उद्देशाने आणि सैन्याच्या वाढत्या पेंशनवरील भार कमी करण्याच्या उद्देशाने ही सैन्य कपात करण्यात येणार असल्याची माहिती आहे.**



सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतीय सैन्य येत्या दोन ते तीन वर्षांत १२.७० लाख सैनिकांपैकी सुमारे २ लाख सैन्यकपात करण्याच्या तयारीत आहेत. भारतीय सैन्याला आधुनिक बनवण्याचा सरकारचा उद्देश आहे. मात्र, सैन्यांचे पगार आणि वाढत्या पेंशनमुळे अनेक समस्या उद्भवत असल्याने ही सैन्यकपात करण्यात येणार आहे.

सैन्यावरील वाढत्या पेंशनचा भार कमी करण्यासाठी जून महिन्यात अग्निपथ योजना जाहीर केली होती. मात्र, या योजनेमुळे बराच वाद निर्माण झाला. आधीच कोविडमुळे सैन्य भरती न झाल्याने सैन्याला १ लाख सैनिकांची गरज भासत आहे. तर दरवर्षी ६० हजार सैनिक हे निवृत्त होत आहे. दरम्यान, यावर्षी अग्निपथ योजनेंतर्गत सुमारे ३५ ते ४० हजार सैनिकांची भरती करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

## भारताच्या जडणघडणीत लोकसंख्यावाढ ठरतेय मारक

आधुनिक केसरी

भारताची लोकसंख्या लवकरच चीनला मागे टाकीत वैश्विक पातळीवर क्रमांक एक वर येणार आहे. ही बाब आपल्यासाठी खास असली तरी अभिमानाची आहे की दुःखाची गोष्ट आहे?. यावर आपले भवितव्य अवलंबून असणार आहे. मर्यादित जागा किंवा मर्यादित क्षेत्रफळ आणि वाढती देशाची लोकसंख्या याचा पूर्ण ताळमेळ बिघडलेला आहे. सर्व प्रकारच्या साधनांची उपलब्धता मर्यादित आहे, हे वास्तव आहे आणि लोकसंख्या अमर्याद आहे हे महावास्तव आहे.त्यामुळे लोकसंख्या पूर्ण नियंत्रणात आणणे हेच लक्ष सर्वांचे असले पाहिजे. भारतीय लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी कुणा एका धर्मवार बोट न ठेवता ,सर्वांसाठी समान अपत्य, जन्म मर्यादा ठेवण्यात यावी. यासाठी नव्याने प्रयत्न करावेत. नवीन लोकसंख्या निती रचावी, लोकांचा पाठिंबा घ्यावा,आणि ही योजना पूर्ण यशस्वी होईल या साठी दीर्घकालिक योजना आखली जावी.

आपल्या देशासाठी आपले सर्वांचे काही कर्तव्य आहे आणि ते सर्वात मोठे कर्तव्य म्हणजे, या देशाला चेंगरा चेंगरीत चिरडण्यापासून वाचवणे. पुढील निदान पंचवीस वर्षे तरी नवं विवाहित जोडप्याने केवळ एकच अपत्य जन्माला घालून आपले राष्ट्रीय योगदान द्यावे ,अशी योजना आखली तरच थोडा तरी आशेचा किरण जिवंत




राहणार आहे. अन्यथा काय गंभीर चित्र राहील याची कल्पनाच करवत नाही. लहान कुटुंब पद्धती खूप चांगली आहे ,हा विचार केवळ कागदात गुंडाळून न ठेवता,तो विचार पूर्ण रुजेल अशी आखणी व्हायला हवी. लोकसंख्या नियंत्रणाचे सर्वात साधे सोपे साधन म्हणजे कंडोम. आज कंडोमचे खाजगी फार्मसी मध्ये काय दर आहेत ? हे कधी लोकसंख्या नियंत्रणाचे काम बघणाऱ्या यंत्रणेने तपासलेले आहे काय? सर्वसामान्य माणसाच्या खिशाला न परवडणाऱ्या या महाग कंडोमच्याद्वारे ही मोठी समस्या नियंत्रणात येईल हे कसे समजायचे .गर्भनिरोधक साधने अतिशय स्वस्त दरांत असावी. सर्व सामान्य लोकांच्या हाती खूप सहजतेने उपलब्ध व्हावीत म्हणजे जेणे करून त्या साधनांचा वापर फार सहजतेने होणे सुरू होईल.


लोकसंख्या नियंत्रणाचे कायदे आणि त्या कायद्याचे फायदे याचा विचार जेव्हा होतो,तेव्हा तो कुणावर तरी धार्मिक अन्याय करून लादू नये.पण याचा अर्थ असा नाही की म्हणून काही लोकांना राजरोस पणे अपत्ये जन्मास घालण्याचे हक्क प्राप्त होतो आहे. माझ्या एकट्याच्या संयमाने काय ही लोकसंख्या मर्यादित होणारं आहे काय? हा प्रश्न सर्व भारतीयांच्या मनात नेहमी येतो. समजा देशातील पाच कोटी लोकांनी आपले संयम प्रदर्शित केले तर पाच कोटींनी लोसंख्या थांबेल, समजा दहा कोटी लोकांनी असा चांगला विचार केला तर दहा कोटींनी लोकसंख्या थांबेल, म्हणून भारतास फार मोठी योजना आखावी लागणारं आहे.



डॉ. हर्षवर्धन कांबळे

काश्मीरपासून तर कन्याकुमारी पर्यन्त असणाऱ्या साऱ्या नागरिकांना या कार्यासाठी कटीबद्ध करावे लागेल.आणि त्यासाठी सरकारने सुद्धा स्वतःची बृहद तयारी सुरू करावी . उदाहरणार्थ त्यात ,समजा जे नागरीक स्वतःचे कुटुंब कल्याणची शस्त्रक्रिया करवू इच्छितात त्यांना सरकारी रुग्णालय सोबतच खाजगी रुग्णालयात निःशुल्क व्यवस्था करून देण्यात यावी. म्हणजे या शस्त्र क्रियांची संख्या अतिशय वेगाने वाढेल. वैद्यकिय क्षेत्रात आपल्या देशाने बरीच मोठी प्रगती केली आहे. पोलिओ लसीकरण मोहीम, कोरोना लसीकरण मोहीम यशस्वी करुन जगाला हेवा वाटावा असे कार्य भारताने केले आहे.जर समजा कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया आणि कंडोमची सहजतेने उपलब्धता या दोन गोष्टींच्या आधारे जनसंख्या मर्यादित ठेवता येवू शकते,तर मग या दोन गोष्टींच्या आधारे ही महत्वपुर्ण योजना का तयार केली जात नाही.? भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात पुढील भविष्यासाठी आम्ही काय तजवीज करून निर्धार करावा असे कुणी म्हणेल ,तर त्यावर सर्वात मोठे उत्तर असेल की लोकसंख्या नियंत्रणात आणणे. आणि हाच भारताच्या जडणघडणीत अडसर ठरत असलेला महत्वाचा प्रश्न आज सर्वांनी लक्षात घेणे गरजेचे आहे.

**(शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड औरंगाबाद)**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# ‘एक अवलिया गायक किशोरकुमार ...’

आधुनिक केसरी

किशोरदांची गाणी आपण रोजच ऐकत असतो. ‘ चलते चलते मेरे ये गीत याद रखना ‘ असेच जणू तो सांगून गेलाय.पण पन्नास ते ऐंशीच्या दशकात जन्मलेल्या व्यक्तींना हे वेगळ सांगावं लागत नाही. त्यांच्या ओठावर बऱ्याचदा किशोरची गाणी नकळत येतातच ! कधी कधी आपण दुःखी असलो, काही कारणाने उदास असलो तर किशोरकुमारची गाणी आपला गेलेला मूड परत आणतात. त्याच्या अनेक गीतांवर मन नकळत ठेका धरायला लागते. अमिताभच्या ‘डॉन’मधील खयके पान बनारसवाला असो किंवा राजेश खन्ना आणि मुमताज यांच्या ‘ आप की कसम ‘ या चित्रपटातील जय जय शिव शंकर किंवा अमिताभच्याच ‘नमकहलाल’ मधील पग घुंगरू



बांध मीरा नाची थी यासारखी गाणी आपल्याला ठेका धरायला लावतात. माणूस कितीही छोटा असो वा मोठा, गरीब असो वा श्रीमंत तो अशा गीतांना डोलून, मान हलवून, किंवा जवळ असेल त्या वस्तूवर ताल धरून आपला आनंद व्यक्त करणारच.

प्रत्येक अभिनेत्याला त्याच्या आवाजाला, व्यक्तिमत्वाला शोभेल असा अनुकूल आवाज काढणे, तोही नैसर्गिक वाटेल असा काढणे हे किशोरकुमारचे सर्वात मोठे वैशिष्ट्य. सुपरस्टार राजेश खन्नापासून तो अँग्री यंग मॅन अमिताभ बच्चन यांच्यापर्यंत प्रत्येक नटाला किशोरकुमार यांचा आवाज हवा असायचा. अगदी १९८४ मध्ये आलेल्या ‘ मशाल ‘ या चित्रपटात त्यांनी अनिल कपूरसाठी ‘ जिंदगी आ रहा हु मै.. हे अप्रतिम गीत गायले. राजेश खन्ना, शशी कपूर, देव आनंद, धर्मेंद्र, जितेंद्र इ. सगळ्या आघाडीच्या नायकांसाठी किशोरकुमारने गाणी गायिली.

**(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# मोबाईल वापराचा इतरांना त्रास होऊ नये

आधुनिक केसरी

एखाद्याच्याच घरांत पूर्वी टेलिफोन असायचा, त्याचा वापरही मर्यादित होत असे. घरातील शांतता टिकवण्यासाठी टेलिफोनवरील संभाषण देखील आवाजाच्या खालच्याच पातळीत होत असे. अलीकडच्या काळांत त्या टेलिफोनची जागा मोबाईलने घेतली. अर्थातच, तंत्रज्ञानाच्या दृष्टीकोनातून खूपच मोठी क्रांती झाली. पण ह्या क्रांतीमुळे मनःशांती मात्र ढळली असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. पूर्वी घरटी एक टेलिफोन होता, आता माणशी एक मोबाईल आहे. ह्यालाही अपवाद आहेच, कारण काहीजणांकडे दोन-तीन मोबाईल्स असल्याचे दिसून येते. त्यातही मोबाईलवर मोठमोठ्या आवाजात बोलणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. काहीजण मोबाईलचा स्पीकर मोठ्या आवाजांत ठेवून सतत आणि सलग अनेक वेळेपर्यंत बोलत असतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रत्येकाच्या मोबाईलचे निरनिराळे रिंगटोन्स आणि त्याच्या आवाजाची पातळी ह्याचा कोणताही विचार न करता सर्रास त्याचा सर्वत्र वापर केला जात असल्याचे आपल्याला नेहमीच दिसून येत असते. ह्याच मोबाईलचा वापर इंटरनेटच्या साह्याने युट्यूब चॅनल्स, गाणी, एफ एम रेडीओ, लाइव्ह टी व्ही पाहण्यासाठी अनेकांकडून सर्रास होत असल्याचे आपण पाहतो. एकूणच ह्या सर्व वापरांत होणाऱ्या आवाजाचा आणि आवाजाच्या पातळीचा कोण आणि किती विचार करतो?

अशा प्रकारचा होणारा वापर हा कोणत्या ठिकाणी होत आहे ह्याचीही अनेकदा वापरकर्त्याला जाणीव होत नाही. शाळा, कॉलेजमध्ये, हॉस्पिटलमध्ये, वर्दळीच्या ठिकाणी, बँकेत, सरकारी कार्यालयांत, धर्मस्थळांमध्ये जिथे शांततेची जरुरी असते, अशाही अनेक ठिकाणी ह्या मोबाईलच्या वापराचा आणि त्याच्या विविध प्रकारच्या आवाजाच्या पातळीचा इतरांना किती त्रास होत असतो, ह्याची साधी जाणीवही होत नसते.



आधुनिक केसरी

## विठ्ठल हो त्राता | जीवभावे ||

आता तरी थोडे | ठेवा अवधान ||
मृत्यूचे कारण | दारी आले ||१||

करावी सलगी | राखूनी अंतर ||
रहावे निरंतर | सावधान ||२||

फुकाचा विश्वास | फुकाची करणी ||
यमाची पाहुणी | महामारी ||३||

वैद्य झाला रोगी | उतारा न याला ||
भाळी भोग आला | कैसा देवा ||४||

अध्यात्माची जोड | विज्ञानी मिळता ||
विठ्ठल हो त्राता | जीवभावे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# गुरू सांगेल तेच साधन



आधुनिक केसरी

परमार्थ म्हणजे काय, हे मी तुम्हाला अगदी थोडक्यात सांगतो. परमार्थाचे जर काही मर्म असेल तर, आसक्ति सोडून प्रपंच करणे हे होय. ज्याने आपल्याला प्रपंच दिला त्याचाच तो आहे असे समजून वागले, म्हणजे आपल्याला त्याबाबत सुखदुःख बाधत नाही. हे साधण्यासाठी गुरुमुखाने दिलेले परमात्म्याचे नाम आपण घेत असावे. गुरु कुणाला करावे ? जिथे आपले समाधान होते तेच गुरुपद म्हणावे. गुरुपद कुठेही एकच असते. गुरूला कोठे आडनाव असते का ? गोंदवलेकर गोंदवल्यास राहात असतील, दुसरा कोणी आणखी कोणत्या गावी राहात असेल. म्हणून लौकिक आडनाव जरी निराळे झाले तरी गुरुपद हे सर्वकाळी अबाधित असेच असते. तुमचे जिथे समाधान झाले त्याला गुरू समजा, आणि तो जे साधन सांगेल त्यातच त्याला पहा; त्याच्या देहाकडे पाहू नका. तो लुळापांगळा आहे की काय, हे पाहू नका. तो देहाने कसाही असला, तरी त्याने सांगितलेल्या साधनात राहा. त्याची लाज, जिथून गुरुपद निर्माण झाले, त्याला असते. गुरुआज्ञा हाच परमार्थ; तो सांगेल तेच साधन. तुम्ही आपल्या मनाने काही ठरवून करू लागलात, तर त्यात तुम्हाला यश येणार नाही. अभिमान धरून काही करू लागलात, तर ते साधणार नाही. म्हणून अभिमान सोडून गुरूकडे जा. गुरू सांगेल तेच साधन हे पक्के लक्षात ठेवा.

खरा परमार्थ हा लोकांना उपदेश करण्यासाठी नाही, तो स्वतःकरता आहे. आपला परमार्थ जगाला जितका कमी दिसेल, तितका आपल्याला फायदेशीर आहे. जगातल्या मोठेपणात मुळीच सार्थकता नाही. खरा मोठेपणा नसताना उगीच मोठेपणा वाटणे, हा तर मोठा घात आहे. एकाने कोळश्याचे दुकान घातले आणि दुसऱ्याने पेढ्याचे दुकान घातले; दुकान कशाचेही असले तरी शेवटी फायदा किती होतो याला महत्त्व आहे. तसे, प्रपंचात कमी जास्त काय आहे याला परमार्थात महत्त्व नसून, मनुष्याची वृत्ती भगवंताकडे किती लागली याला महत्त्व आहे. परमार्थाला कोणतीही परिस्थिती चालते. आपली वृत्ती मात्र स्थिर असली पाहिजे. एकीकडून मनाचे संयमन आणि दुसरीकडून भक्तीचा जोर असला, म्हणजे परमार्थ लवकर साधतो. खरोखर परमार्थ इतका सोपा आहे, की तो सहज रीतीने करता येतो. पण गंमत अशी, की तो सोपा आहे म्हणून कुणीच करीत नाही. प्रपंच हा परमार्थाच्या आडकाठीसाठी नाही, तो परमार्थासाठीच आहे, हे पक्के लक्षात ठेवावे. साधकाने देहाचे कर्तव्य प्रारब्धावर टाकून, मनाने मात्र ईश्वरोपासना करावी.

**-श्रीसद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# अर्जुनाचे बाण व बीजगणित

आधुनिक केसरी

भास्कराचार्य (ई.सन १११४ ते ११८५) मध्ययुगीन भारतातील एक महान गणितज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म कर्नाटक राज्यात झाला. गणितातील वेगवेगळ्या गणना (DIFFERENTIAL CALCULUS) शोधून काढणाऱ्या गणितीय शास्त्रज्ञांचे ते पूर्वाधिकारी होते, अगदी न्यूटन आणि लीबनीझ यांच्याही पूर्वी ५०० वर्षे.

भास्कराचार्य यांनी गणितावर आधारित संस्कृत भाषेत ४ ग्रंथ लिहिले. त्यातील एकाचे नाव आहे लीलावती, ज्याच्यात गणितासंबंधित काही कोडी आहेत, गहन प्रश्न आहेत, ज्यावर अनेक विद्वानानी संशोधन करून उत्तर मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. हे कोड्यांसारखे प्रश्न श्लोकांच्या रूपात आहेत व त्यामुळे ते समजून घेणे सुद्धा कठीण वाटते. ह्या कोडीस्वरूप प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी ह्या श्लोकांचा व्यवस्थित अर्थ समजून घेणे अत्यावश्यक आहे.

हा खाली दिलेला श्लोक वाचा

पार्थः कर्णवधाय मार्गणगणं क्रुद्धो रणे संदधे
तस्यार्धेन निवार्य तच्छरगणं मूलैश्चतुर्भिर्हयान् |
शल्यं षड्भिरथेषुभिस्त्रिभिरपि च्छत्रं ध्वजं कार्मुकम्
चिच्छेदास्य शिरः शरेण कति ते यानर्जुनः संदधे || ७६ ||

ह्या श्लोकाचा सरळ अर्थ म्हणजे जणू काही खाली दिलेला प्रश्नच आहे,

अर्जुन आणि कर्ण यांच्यातील महाभारत युद्धामध्येअर्जुनाने काही बाण सोडले, सोडलेल्या काही बाणांपैकी अर्धे बाण कर्णाने मारलेले बाण थांबविण्यासाठी खर्ची पडले. एकूण बाणांच्या वर्गमूळाच्या ४ पट बाण, कर्णाच्या रथाच्या घोड्यांना नियंत्रणात आणण्यासाठी वापरले गेले. ६ बाण कर्णाचा सारथी शल्य याच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी वापरले गेले. (शल्य हा नकुल आणि सहदेव यांचा मामा होता) कर्णाच्या रथावरील छत्र व झेंडा, तसेच कर्णाचे धनुष्य, यावर ३ बाण मारले गेले. शेवटी एका बाणाने कर्णाचा वध करण्यात आला.

तर मग ह्या युद्धात अर्जुनाने किती बाण सोडले?

योग्य समीकरणाने ह्या प्रश्नातील गणिताचे उत्तर नक्कीच मिळू शकेल.

एकूण बाणांची संख्या X आहे असे धरून चालूया बाणांसंबंधी जी काही विधाने वर केलेली आहेत त्यांना गणितरूपात असे मांडता येईल

$X = X/2 + 4X + 6 + 3 + 1$

वरील गणित सोडवले तर अर्जुनाने सोडलेल्या एकूण बाणांची संख्या X = १०० अशी येते.

परंतु असे उत्तर काढल्यावर प्रश्न इथेच थांबत नाही. ह्या श्लोकात बरीच काही गुप्त माहिती आहे. आपण जर खोलात जाऊन विचार केला तर बरीच काही गुप्त माहिती आपण शोधू शकतो. कर्णावर मात करण्यासाठी अर्जुनासारख्या अतिरथी योद्ध्याला ५० बाण वापरावे लागले. यावरून आपल्याला कर्णाच्या युद्ध कौशल्याची



महती कळते.

रथ चालविणाऱ्या घोड्यांना थांबविण्यासाठी ४० बाण वापरावे लागले, यावरून त्या घोड्यांना रणभूमीवर लढण्यासाठी किती प्रशिक्षण दिले असेल हे आपल्या लक्षात येते.

घोड्यांसाठी ४० बाण खर्च झाले, पण शल्य (रथाचा सारथी) फक्त ६ बाणांनी शरण आला, यावरून आपल्याला कळते की शल्य हा अर्जुनाच्या बाजूनेच होता.

कर्णाचा रथ आणि धनुष्य नियंत्रणात आणण्यासाठी फक्त ३ बाण लागले, यावरून कर्ण किती हतबल असहाय्य होता हे कळते.

आणि एकदा सर्व काही नियंत्रणात आले की शत्रूला नेस्तनाबूत करायला एकच बाण पुरेसा होता हे लक्षात येते.

तर अशी लढाई जिंकण्यासाठी आवश्यक असलेले नियम व कौशल्ये यांची कार्यप्रणाली असे सांगते की सर्वप्रथम शत्रूची लढाऊशक्ती संपवा, दुसरे म्हणजे शत्रूची वाहन साधने, उदाहरणार्थ रथ घोडे वगैरेंची हालचाल थांबवा आणि तिसरे म्हणजे त्याचा रथ, त्याची वाहतुकीची साधने नष्ट करून, नादुरुस्त करून, त्याला असहाय्य करा व अशातऱ्हेने सरते शेवटी शत्रूचा निःपात करा.

आपण हाच श्लोक जर अध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहिला तर संपूर्ण मुक्ती मिळविण्यासाठी सर्वप्रथम आपल्याला आपल्यातील कामना आसक्ती यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. हे जरा कठीण आहे व म्हणून याला ५० बाण वापरावे लागतील.

त्यानंतर पंचज्ञानेंद्रिये, तसेच पाच घोड्यांनी सूचित केलेले पंचविषय किंवा पंचतन्मात्रा नियंत्रणात आणा, याला लागणारे ४० बाण सुचवतात की हे सुद्धा कठीण आहे.

पंचज्ञानेंद्रियांवर नियंत्रण आणल्यावर आत्मतत्त्वाने सूचित केलेल्या मन बुद्धी चित्त आणि अहंकार यावर नियंत्रण आणण्याच्या दिशेने वाटचाल सुरु होईल.

कामना आसक्ती वगैरेचा त्याग केलात, जुने सगळे विसरलात, तर मोक्षप्राप्ती सहजसुलभ होऊ शकेल.

ही आपल्याला पूर्वजांनी दिलेली सनातन धर्मातील देणगी आहे. मूल्यांसहित विद्या - एका श्लोकात किती गहन अर्थ भरला आहे.

# सी. ए. परीक्षेत ईलाइट कोचिंग अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

आधुनिक केसरी न्यूज

आयसीएआय यांनी दिनांक १० ऑगस्ट, २०२२ रोजी जाहीर केलेल्या सी. ए. फौंडेशन जुन-२०२२ परीक्षे च्या निकालामध्ये ईलाइट कोचिंग अकॅडमीमधील ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ईलाइट कोचिंग अकॅडमीच्या संचालिका श्रीमती चेतना अग्रवाल यांनी ईलाइट कोचिंग अकॅडमी बाबत अधिक माहिती देताना सांगितले, ईलाइट कोचिंग अकॅडमीची जानेवारी २०१८ मध्ये औरंगाबाद स्थापना झालेली आहे.
चार्टड अकाऊंटंट (सी. ए.) विद्यार्थ्यांनां एकाच ठिकाणी सर्व सुविधा आम्ही देत आहोत.ईलाइट कोचिंग अकॅडमी यांनी सुरु केलेली पोर्शन वाईज टेस्ट सिरीज व च्याप्टर वाईज टेस्ट सिरीज सी. ए. फौंडेशन, सी. ए. इंटर व सी. ए. फायनल करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या आयसीएआयच्या परीक्षेत यशस्वी होण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. पोर्शन वाईज टेस्ट सिरीज व च्याप्टर वाईज टेस्ट सिरीजच्या हे परीक्षे संबंधी सराव, सादरीकरण, सुधारणा, पुनःअभ्यास, नियोजनासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे.
जुलै महिन्यात जाहीर करण्यात आलेल्या सी. ए. इंटर व सी. ए. फायनल परीक्षेमध्ये सुद्धा ईलाइट कोचिंग अकॅडमीच्या ०७ व ०८ विद्यार्थ्यांना यांना यश मिळाले आहे. सी. ए. फायनल परीक्षेमध्ये उत्तीर्ण होऊन ईलाइटचे ०५ विध्यार्थी हे चार्टड अकाऊंटंट झाले आहेत. ईलाइटचे विद्यार्थी श्री. नितीन डूनगाहू यांनी पहिल्याच प्रयत्नात सी. ए. फायनल परीक्षेत यश मिळविले असून त्यांनी ५२७ गुणासह औरंगाबाद जिल्हा मध्ये प्रथम क्रमांक पटकवला आहे. ईलाइटच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या.




सीए परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी दिशा गिरीश जोशी आणि नितीन दुन्गाहुचे अभिनंदन करताना श्रीमती चेतना अग्रवाल.

**ईलाइटचे यशस्वी विद्यार्थी**

**सी. ए. फायनल**

1. सी. ए. नितीन दुनगाहू (CLEARED IN 1ST ATTEMPT, ABAD DISTRICT TOPPER)
2. सी. ए. प्रेरणा प्रशांत संघाई
3. सी. ए. यश सत्यनारायण सुनिता लोहिया
4. सी. ए. ओमकार राजेंद्र औटी
5. सी. ए. सिद्धेश प्रभाकर शेवाळे
6. वैभव चंद्रकांत वाघचौरे (CLEARED GROUP 1)
7. वरद पाठक (CLEARED GROUP 2)
8. विलास नाईक (CLEARED GROUP 2)

**सी. ए. इंटरचे विद्यार्थी**

१. अथर्व कुलकर्णी, २. प्रेरणा बरकसे, ३. रितिका मानधनी, ४. अंजली जाधव, ५. सिद्धांत सुराणा, ६. गणेश रोडगे, ७. ऐश्वर्या भोगावकर.

**सी. ए. फौंडेशनचे विद्यार्थी**

१. ज्योती डोईफोडे, २. दिशा जोशी, ३. श्रुती डोमले, ४. हर्षदा हरीशचंद्रे, ५. कीर्ती जाधव, ६. सिद्धी वर्मा, ७. अभिजित फलफले, ८. रोहित मगर, ९. बलवंत पोफाळे, १०. सिद्धांत देशमाने. ११. व्यंकटेश जोशी.

# बाळकृष्ण मंदाडे ठरले सायकलवीर : धर्माळे

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा .रमेश वाघमारे**

**पुसद :** बाळकृष्ण मंदाडे यांनी केवळ चार दिवसात पुसद ते पंढरपूर जाऊन विठुरायाचे दर्शन घेतले त्यामुळे त्यांना सायकलवीर म्हणणे उचित ठरेल, असे प्रतिपादन ग्रामगीताचार्य गणेश धर्माळे यांनी सत्कारप्रसंगी केले.
मातोश्री सुभद्राबाई जिल्हेवार विद्यालय श्रीरामपूर येथील शिक्षक बाळकृष्ण मंदाडे यांचा सुरमई सायकलिंग ग्रुप तर्फे चिंतामणी मंदिराजवळ नुकताच सत्कार करण्यात आला. बाळकृष्ण मंदाडे, अनंत जाधव, प्रमोद रायपूरकर, माधव बांगर, राजेंद्र महाजन हे पाच शिक्षक पुसद ते बेलोरा, हिंगोली, परभणी, परळी, उस्मानाबाद, कळंब, बार्शी मार्गे चौथ्या दिवशी पंढरपूर गेले व महाराष्ट्राचे आराध्य दैवत पांडुरंग परमात्म्याचे दर्शन घेऊन आले. सत्कारप्रसंगी मंदाडे यांनी वाटेत येणारे अडथळे-पाऊस-घाट ह्याबद्दल सांगून रस्त्यात लोकांनी व मुक्कामी मित्रांनी केलेले सहकार्य व दर्शनाच्या तळमळीने आनंदात प्रवास झाल्याचे सांगितले. बाळकृष्ण मंदाडे हे सुरमई ग्रुपचे उपाध्यक्ष असल्यामुळे सर्वांना आनंद झाला सत्कारप्रसंगी अविनाश खापरे, रमेश हिंगमीरे, राजाभाऊ. परमात्म्याचे दर्शन घेऊन आले. सत्कारप्रसंगी मंदाडे यांनी वाटेत येणारे अडथळे-पाऊस-घाट ह्याबद्दल सांगून रस्त्यात लोकांनी व मुक्कामी मित्रांनी केलेले सहकार्य व दर्शनाच्या तळमळीने आनंदात प्रवास झाल्याचे सांगितले. राजाभाऊ देशमुख,प्रकाश वास्टर, मोहन बोजेवार, संतोष काळे, सागर हरीमकर, श्याम शेंडगे, डॉ अरुण राठोड, अतुल नेरकर साहेब, अरुण बोरके, रामटेके सर, मनोज काळे, जगदीश जाधव, समीर भागवतकर,नंदकुमार बोरकूट, श्रीकांत तायवाडे आदी उपस्थित होते .

# गोमंतकीयांचे हिंदीभाषा प्रेम प्रशंसनीय : सतीश धुरी

## गोमंतक राष्ट्रभाषा विद्यापीठातर्फे हिंदी कविसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**मडगाव :** गोमंतकात हिंदी भाषेचे प्राबल्य नसून देखील इथे अनेक आबालवृद्ध कवी व कवयित्री हिंदी भाषेत लेखन करीत आहेत, ही प्रशंसनीय बाब आहे, गोमंतकीयांच्या हिदी भाषाप्रेम प्रशंसनीय आहे,असे उद्गार सतीश धुरी यांनी काढले. युवा पिढी आणि मान्यवरांनी उत्कृष्ट, बोधप्रद आणि आशयबद्ध कविता ऐकून मी प्रभावित झालो, असेही ते म्हणाले.
'गोमंतक राष्ट्रभाषा विद्यापीठ' या संस्थेतर्फे मडगाव येथे अलीकडेच सम्राट क्लब मडगावच्या सहकार्याने वार्षिक हिंदी कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कोकण रेल्वेच्या कारवार विभागाचे राजभाषा अनुवाद अधिकारी सतीश एकनाथ धुरी होते. यावेळी व्यासपीठावर सम्राट क्लब, मडगावचे अध्यक्ष हरेश राव आणि गोमंतक राष्ट्रभाषा विद्यापीठाच्या उपाध्यक्ष ज्योती कुलकर्णी होत्या.
यावेळी ३० कवी, कवयित्रींनी आपापल्या कविता सादर केल्या. विद्यापीठाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला श्रोत्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी सागर शायर तथा प्रकाश क्षीरसागर यांनी

मैं तो सीधा साधा हूं
लोग कहते आधा हूं
कृष्ण नाम में डुबी हूं
वह समझते राधा हूं
भूमि तपति हैं छांव में
मेघ वर्षा की बाधा हूं

हे मुक्तक आणि

हर किसी को समझ पाना हैं मुश्किल ।
दिल की उलझन सुलझाना हैं मुश्किल।

ही गझल पेश केली.
अभय सुराणा, महेश पारकर, विशाल नारायण आदी कवींनी आपल्या कविता सादर केल्या. चंदा कित्तूर यांनी सूत्रसंचालन आणि स्वरूपा कुंदे यांनी आभार प्रदर्शन केले.




**गोमंतक राष्ट्रभाषा विद्यापीठातर्फे मडगावात आयोजित कविसंमेलनात गझल सादर करताना प्रकाश रामचंद्र क्षीरसागर. बाजूस ज्योती कुलकर्णी, सतीश धुरी आणि हरेश राव.**

# स्वप्नातील घर बांधण्याची सुविधा आता जालन्यात उपलब्ध : खोतकर

## पीपी डिझाईन स्टुडिओचे थाटात उद्घाटन




आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** थ्रीडी मॉडेलिंग सह स्वप्नातील घर बांधण्याची सोय 'पीपी डिझाईन स्टुडिओ'च्या माध्यमातून जालना शहरातच उपलब्ध झाली आहे. ही जालनेकरांसाठी आनंदाची बाब होय, असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी केले. रविवारी रेल्वे स्टेशन ते उड्डाणपूल रस्त्यावरील कृष्णा प्लाझा येथे पीपी डिझाईन स्टुडिओचा शुभारंभ महंत परमपूजनीय बाबुळगावकर शास्त्री, माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते झाला. यावेळी बोलताना श्री. खोतकर म्हणाले की, प्रणव गुलाबराव पाटील यांनी वास्तुविशारद(बी. आर्च.) ही पदवी नामांकित संस्थेतून घेतली आहे. त्यांचा अनुभव आणि कुशलता कौतुकास्पद आहे. स्वप्नातील घर बांधण्याची सुविधा आता आपल्या जालना शहरातच उपलब्ध झाली आहे. विशेष करून थ्रीडी मॉडेलिंगची सोय औरंगाबाद, पुणे किंवा मुंबई येथे होती. ती आता आर्किटेक्ट प्रणव पाटील च्या माध्यमातून जालना शहरातच उपलब्ध झाली आहे. विविध प्रकारच्या आकर्षक आणि उपयुक्त वास्तू उभारण्याची सोय निर्माण झाली आहे. यावेळी आशीर्वादपर बोलताना महंत शास्त्रीबुआ यांनी सांगितले की, घर हे व्यक्तीचे स्वप्न असते. स्वप्नातील घरात सुख नांदले पाहिजे आणि त्या दृष्टीने प्रणव सारख्या तरुणाचे कसब आणि कौशल्य वाखणण्यासारखे आहे. प्रणवच्या उपक्रमास शास्त्री बुवा आणि माजी राज्यमंत्री श्री खोतकर यांनी सदिच्छा व्यक्त केल्या.
पीपी डिझाईन स्टुडिओच्या शुभारंभ निमित्त सर्वश्री प्रसिद्ध विधीज्ञ हरिभाऊ झोल,सीमाताई खोतकर,सौ. झोल, माजी नगराध्यक्ष भास्करराव आंबेकर, माजी आमदार शिवाजीराव चोथे, संतोषराव सांबरे, भीमराव पाटील डोंगरे,अनिरुद्ध खोतकर, रामेश्वर पाटील भांदर्गे, भास्करराव दानवे, संजय खोतकर, पंडितराव भुतेकर, अभिमन्यू खोतकर, आर आर खडके पाटील, ज्ञानदेव पायगव्हाणे, उद्योजक कैलासजी लोया, शिवरतनजी मुंदडा, संजयजी राठी, अरुणजी अग्रवाल, विनयकुमार कोठारी, अंबरीश लाहोटी, रमेश पाटील गव्हाड, पी एन यादव, जयप्रकाश चव्हाण, राजेश राऊत, सुनील बापू आर्दड, सुदामराव सदाशिवे, बाबासाहेब इंगळे, रमेश देहडकर, संजय देठे, केशव जंजाळ, उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे, सहाय्यक निबंधक नामदेव चव्हाण, पोलीस निरीक्षक घुले, ज्ञानेश्वर पायघन, कृषी अधिकारी रामेश्वर भुते, माजी जि प. मुख्य का.अधिकारी शिवाजी दिवेकर, शिक्षणाधिकारी मधुकरराव देशमुख, मंगल धुपे, मुख्याधिकारी अविनाश खांडेकर, डॉ. प्रदीप हूसे, डॉ. बळीराम बागल, डॉ. रामेश्वर वरकड, डॉ. विष्णू भुते, डॉ. संजय राख, जिल्हा सरकारी वकील दीपक कोल्हे, अड. प्रदीप कोल्हे, बाप्पा गोल्डे, शिवाजीराव गोंटे, धैर्यशील अरविंदराव चव्हाण, अशोकराव आगलावे, प्रल्हादराव काकडे, निरज राठी, अनुराग कपूर, संतोष मोहिते,भाऊसाहेब घुगे,विनोद रत्नपारखे, शैलेश घुमारे, आलम खान पठाण जेष्ठ पत्रकार बद्रीनाथ टेकाळे, दिलीपराव राठी, भारत धपाटे, कृष्णा तिडके, संजय देशमुख, राजेश भिसे, भरत मानकर, अरविंद देशमुख, जयराज खोतकर, विनीत सहानी, मोहन इंगळे, डॉ. रामेश्वर साबळे, युवराज काशीद, किशोर पांगारकर, प्राचार्य डॉ. बी. आर. गायकवाड, प्रा. नारायणराव बोराडे, प्राध्यापक शिवकुमार सोळुंके, पांडुरंग खराबे, गणेशराव तरासे, धर्मेंद्र वाघमारे, दीपकराव पारवे, बावणे, डॉ. पोटे, जगन्नाथ काकडे, प्राचार्य सचिन देशमुख, वास्तु विशारद मृणालताई काशीद,रेश्मा कुलकर्णी, आकांक्षा कंठाळे, रोहित रौल, जनार्दन कोतकर इंजि. विनायक पालकर, कैलास पवार, साईनाथ पवार,भारत सपकाळ,दामोधर बावस्कर,उत्तम काकडे, आर. एस.पाटील सुहास कुलकर्णी गंगाराम आढाव यांच्यासह माऊलीनगर येथील रहिवासी आणि सर्व क्षेत्रातील मान्यवरानी शुभेच्छा दिल्या.


आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार


● घाऊक आणि किरकोळ ● किराणा, सुका मेवा, मसाले
● क्रॉकरी, घरगुती उपकरणे ● घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
● प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# शिंदे गट-भाजपात वादाची ठिणगी

आधुनिक केसरी

संजय राठोड यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आल्याने शिंदे गट आणि भाजपामध्ये वादाची नवी ठिणगी पडली आहे. भाजपा नेत्या चित्रा वाघ यांनी जाहीरपणे संजय राठोड यांना विरोध केला असून पूजा चव्हाणच्या मृत्यूला कारणीभूत असणाऱ्या संजय राठोड यांना पुन्हा मंत्रीपद दिले जाणे हे अत्यंत दुदैवी असल्याचे म्हटले आहे तसंच आपला लढा सुरु राहणार असल्याचंही सांगितलं आहे. दरम्यान, चित्रा वाघ यांच्या टीकेला संजय राठोड यांनी उत्तर दिलं आहे. "लोकशाहीत सर्वांना बोलण्याचा अधिकार आहे. चित्रा वाघ यांना माहिती नसावे. त्यांना कागदपत्रे पाठवण्याची व्यवस्था करु. पोलिसांनी निष्पक्ष चौकशी केली आहे. न्यायव्यवस्थेवर आणि पोलिसांवर विश्वास असल्याने मी आतापर्यंत शांत होतो. सर्व सत्य बाहेर आलं आहे. मी नको ते भोगलेलं आहे. त्यामुळे माझी सर्वांना विनंती आहे, माझाही परिवार आहे, पत्नी आहे, मलाही मुलंबाळ आहेत, वयस्कर आई-वडील आहेत. एखाद्याला किती त्रास होतो याचा आपणही विचार केला पाहिजे. मी चार वेळा मोठ्या मताधिक्क्याने निवडून आलो आहे. तसे असते तर जनतेने मला निवडून दिले नसते", असे संजय राठोड म्हणाले आहेत. "आत्तापर्यंत मी शांत होतो, पण असेच सुरु राहिले तर मी कायदेशीर मार्ग अवलंबणार, नोटीसही देणार," असा इशारा संजय राठोड यांनी यावेळी दिला. "माझ्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे यासाठी दाखल झालेली याचिका पुणे कोर्टाने दोन वेळा फेटाळून लावली होती. माझ्याविरोधात कोणताही गुन्हा दाखल नाही, कोणतीही तक्रार नाही. तरीही आरोप झाले म्हणून चौकशी करण्यात आली. त्यानतंर मी मंत्रीपदावरुन बाजूला झालो होते. याप्रकरणी निष्पक्षपणे चौकशी झाली आहे," असा त्यांचा दावा आहे. "लोकशाहीत प्रत्येकाला बोलण्याचा अधिकार आहे. पण आपण काय बोलत आहोत याचं भान हवं. मीदेखील जबाबदार लोकप्रतिनिधी आहे. त्यामुळे यापुढे कोणी काही बोलले तर मी कायदेशीर कारवाई करणार", असे ते म्हणाले.



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

# युवाशक्ती : देशाचे भांडवल

आधुनिक केसरी

**देशाच्या प्रगतीचे सुकाणू युवकांच्या हाती आहे असे म्हटले जाते. भारत हा जगातील सगळ्यात मोठा तरुणांचा- युवकांचा देश आहे. भारतात पासष्ट टक्के युवकांची संख्या आहे,असे म्हटले जाते.युवापिढीचे क्षमतेवर, ताकतीवर भारतही जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पहात आहे. आजच्या परिस्थितीत काही ठरावीक युवा पिढीत नवीन शिकण्याची आवड आहे, जिद्दही आहे.देशाच्या विकासात त्यांचा सहभाग आहे.आज देशाच्या सीमेवर जाऊन आपल्या देशाच्या रक्षण करणारा देशभरातील युवकच आहे.त्याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे.**

जागतिक स्तरावर बारा ऑगस्ट हा दिवस "जागतिक युवा दिवस"म्हणून साजरा केला जातो.युवकांशी निगडीत काही विषयावर चर्चा घडवून आणली जाते.

लिब्सन येथे ८ ते १२ ऑगस्ट १९९८ मध्ये पार पडलेल्या युवकांशी निगडीत मंत्र्यांच्या परिषदेत १२ ऑगस्ट जागतिक युवा दिवस साजरा करण्याची शिफारस केली गेली.आणि त्यावर १७ डिसेंबर १९९९ रोजी संयुक्त राष्ट्र महाससभेने शिक्कामोर्तब केले,तेव्हापासून १२ ऑगस्ट हा दिवस जागतिक युवा दिवस म्हणून साजरा होतो.

युवा दिवस साजरा करत असताना युवकांशी निगडीत काही,विषय/प्रश्नांची शासकिय आणि युवा पातळीवर चर्चा होणे आवश्यक वाटते.

काय आहेत ते प्रश्न ?

युवक आणि विद्यार्थि संघटना. युवक आणि राजकीय संघटना. युवक आणि सोशल मिडिया. युवक आणि राजकारण. युवक आणि सामाजिक जाणिवा,जबाबदारी.

महाविद्यालयीन स्तरीय युवकांच्या विद्यार्थी संघटना आहेत. एकेका महाविद्यालयात दोन/तिन/चार अशा संघटना बघायला मिळतात.ह्या संघटना कुठल्या ना कुठल्या पक्षाच्या अधिपत्याखाली कार्य करत असतात. त्यामुळेच पक्षापक्षातील मतभेद ह्याच्यातही पहायला मिळतात. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवणे, अँडमिशन मधला, मग तो महविद्यालय,होस्टेलमध्ये अँडमिशन,जादा फीस आकारणी कडे लक्ष देऊन विद्यार्थी वर्गाला न्याय मिळवून देणे हे महत्वाचे काम संघटनेचे आहे.पण ह्यांचा अधिकतर वेळ वादातच जातो,बऱ्याच वेळा पोलिसा पर्यंतही वाद जातात. मुंबई, पुणे,दिल्ली, आदि अनेक ठिकाणच्या मागील काही काळात घडलेल्या घटनावरुन दिसते काय आणि किती हिंसक स्वरूप असते ते.

राजकीय पक्षाच्या युवा संघटना,शाखा, आहेत.पण त्यात काही लाखाच्या संख्येत युवकांचा सहभाग असतो अगदीच नगण्य युवकांना कुठल्यातरी मंडळावर,सहकारी बँकेवर,जिल्हा परिषद, पंचायत समित्यावर त्यांची वर्णी लागते. त्यातही जवळचे कार्यकर्ते यांनाच संधी दिली जाते. बाकी युवक हे फक्त आधारस्तंभ असतात. त्यांना वापरून घेतले जात असते. हे आधारस्तंभ अधांतरीच असतात. त्यांच्या भवितव्याचा कुठलाही विचार त्यांच्याजवळ नसतो. आजचा युवक इंटरनेट,मोबाईल, इन्स्टाग्राम, फेसबुक,वॉट्साप,अशा सोशल मिडियाच्या जाळ्यात नको तितका अडकला आहे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.हवा तेवढा उपयोग न घेता,नको तेवढा दुरूपयोग केला जातो.त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात युवक त्यात अडकून आत्ममग्न झालाय.चुकीचे दिशेने वापर होतोय.संवाद कमी होतोय.वाचन कमी झालय.



नविन तंत्रज्ञान मिळतय,सगळ जग जवळ आलय,पण माणसं हरवली आहे. मिडियाचा योग्य वापर करण्याची समज नाही...म्हणून वाटते विधायक वळण द्यायला हवे. राजकीय पक्ष तरूणांचा वापर निवडणूक कामी मोठ्या प्रमाणावर करुन घेतो.त्या बदल्यात काय मिळते? ढाब्यावर मनसोक्त जेवण,अर्थातच खाणे पिणे.महिनादोन महिने फुकट मिळते पण व्यसन कायम चिकटते.यामुळेच खुप मोठा बेरोजगार तरुण वर्ग व्यसनाधीन होऊन पुढाऱ्यांमागे धावण्यात आपली उमेदवारी वर्ष वाया घालवतोय. कारण कुठले न कुठले निवडणूका असतातच.रोजगार नसलेला लाखो करोडोच्या संख्येने युवक ह्यात गुरफटला आहे. आंदोलन, मोर्चे या कामीच त्यांचा फक्त वापर वर्षानुवर्षे करुन घेतला जातोय ही गंभीर बाब आहे.त्यातच त्याच्या समाजिक जाणिवा लोप पावत आहेत.समाजातला अत्याचार, भ्रष्टाचारा बद्दल त्याला काही घेणे देणे नाही.तो पेटून उठत नाही. त्यांच्या जाणिवा बोथट झाल्या आहेत. घरातल्या घरात खूनाचे प्रकार घडताय .कुठून आली आहे ही अस्वस्थता? रोजगार नसल्याने फार मोठ्या संख्येने युवक अस्वस्थ आहे.ज्या ठिकाणी संधी उपलब्धता असते,तिथे पोहचत नाही किंवा टिकाव लागत नाही.वैचारिक क्षीणता यायला लागलीय. धुम्रपान,मद्यपानाचे आहारी जात आहे. एकीकडे शेतकरी युवक वर्ग आहे.सिस्टीम मधल्या भ्रष्टाचाराने तो गांजला आहे.खते,बियाणे,ह्यातही भ्रष्टाचार,बोगस बियाणे अनेक प्रश्नांनी तो ही त्रासला आहे. वैचारिक क्षिणतेमुळे अनेक युवक आत्महत्त्या करताहेत. खर तर युवाशक्तित खूप सामर्थ्य नक्कीच आहे.स्वामी विवेकानंदाचे जयंतीलाही राष्ट्रीय युवा दिवस साजरा करतो. त्यांना युवाशक्तिवर खूप विश्वास होता.युवा शब्दातच वायु म्हणजे गती आहे.त्यांना संस्कारक्षम, कणखर, राष्ट्राप्रती,समाजाप्रती प्रेम,असणारा निर्व्यसनी युवक अपेक्षित होता,आहे.

युवा दिन साजरा करतांना ह्या सर्व गोष्टींची चर्चा,सर्वक्षेत्रातील युवकांना,युवा संघटनांना व्यासपीठ उपलब्ध करुन देऊन व्हायला हवी.युवकांची मन की बात ओळखायला हवी. शासनाने बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन द्यायला हवा आहे.नवनविन संधी प्राप्त करुन द्यायला हव्यातच. हाच त्यावर एकमेव उपाय आहे.

नाही तर, राष्ट्राची ताकद म्हणून ज्या युवकां कडे आपण पहातो,ती युवापिढी राजकारण, सोशल मिडियाचे,निवडणूकीच्या,फेऱ्यात बरबाद होणार हे निश्चित. बेरोजगार, व्यसनाधीन युवकांचा देश व्हायला आता वेळ लागणार नाही. तशा काही युवकसंघटना चांगले कार्य करत आहेत, असतील,तरी ते खूप तोकडे आहे. आज आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत, तो करीत असताना या प्रश्नाकडे गंभीरपणे बघणे आणि विचार करणे अतिशय आवश्यक आहे.

युवा दिन साजरा करतांना शासनाने-राजकीय नेत्यांनी ह्या गोष्टी प्रामुख्याने विचारात घ्यायला हव्या.युवा शक्तिला,युवा संघटनांना विधायक वळण द्यायला हवे हे मात्र नक्की.युवक हेच देशाचे खरे भांडवल आहे, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. आणि म्हणूनच त्यांच्या समस्या कडे त्यांना शिक्षणाप्रमाणे रोजगारसंधी मिळेल याकडे लक्ष दिल्यास ,युवकही परदेशी शिक्षणाकडे आकर्षित न होता देशातच राहून आपल्या ज्ञानाचा फायदा देईल यात शंका नाही.



# सबसे बडा खिलाडी : सुरेश कलमाडी

आधुनिक केसरी

**पुणे मॅरेथॉन, पुणे फेस्टिवल, पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल हे उपक्रम सातासमुद्रापार पोहोचलं ते कलमाडींमुळेच.... मुकेश अंबानी, टाटा, बिर्लापासून अमिताभ बच्चन आणि राजीव गांधी, अटल बिहारी वाजपेयी आडवाणी, शरद पवार अशा दिग्गजांना ज्यांचा सहवास हवाहवासा वाटायचा असे वलय होतं कलमाडींचं एकेकाळी...! देशात.. महाराष्ट्र आणि महाराष्ट्रात.. कलमाडी... अशी दिल्लीकर राजकारण्यांमध्ये क्रेझ असलेले कलमाडी म्हणजे अफाट जनसंपर्क व ऊर्जेचा न आटणारा झरा...! आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनांवर हुकुमत गाजवावी ती कलमाडींनीच....**

जितेंद्र आव्हाड

कित्येक वर्षांनंतर सुरेश कलमाडी यांचं आज सार्वजनिक दर्शन झालं. पुणे फेस्टिव्हलचं निमंत्रण द्यायला पुणे महापालिकेत आयुक्तांना भेटायला आलेल्या कलमाडींना पाहून धक्काच बसला. धक्का अशा अर्थाने की, वयाच्या ऐंशीच्या उंबरठ्यावर पोहोचलेले 'हेच ...का ते कलमाडी..? 'असं म्हणत स्वतःलाच चिमटा काढावा असे त्यांना जवळून ओळखणा-यांना हमखास वाटलं असणार... पुणं म्हटलं की कलमाडी.. असं समीकरण एकेकाळी घट्ट रुजलेल्या या सांस्कृतिक राजधानीवर तब्बल साडेतीन दशके (३५ वर्ष) अधिराज्य गाजवलेली ही व्यक्ती इतकी वृद्ध झालीय, काठी घेऊन चालावं लागतंय ? हा खरोखरच त्यांना समोरासमोर पाहणा-यांसाठी धक्का होता. मानवी जीवनाचा उत्तरकाळ (म्हातारपण) कोणालाच चुकलेला नाही, परंतु काही व्यक्ती अशा असतात की, त्यांनी कधी म्हातारं होऊच नये ? अशांमध्ये कलमाडी मोडत. एकेकाळचे स्टाईल आयकॉन, तरुणांचे आयडॉल असलेले आणि इव्हेंट मग तो सार्वजनिक कार्यक्रमाचा असो की राजकारणाचा... झपाटून जाणं म्हणजे काय ? ते कलमाडींपासून शिकावं...! पुणे मॅरेथॉन, पुणे फेस्टिवल, पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल हे उपक्रम सातासमुद्रापार पोहोचलं ते कलमाडींमुळेच.... मुकेश अंबानी, टाटा, बिर्लापासून अमिताभ बच्चन आणि राजीव गांधी, अटल बिहारी वाजपेयी आडवाणी, शरद पवार अशा दिग्गजांना ज्यांचा सहवास हवाहवासा वाटायचा असे वलय होतं कलमाडींचं एकेकाळी...! देशात.. महाराष्ट्र आणि महाराष्ट्रात.. कलमाडी... अशी दिल्लीकर राजकारण्यांमध्ये क्रेझ असलेले कलमाडी म्हणजे अफाट जनसंपर्क व ऊर्जेचा न आटणारा झरा...! आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनांवर हुकुमत गाजवावी ती कलमाडींनीच.... शरद पवारांना १९९०च्या दशकात पंतप्रधान पदाच्या काठावर पोहचवण्याची कामगिरी कलमाडींच्या नावावर अजूनही शाबूत आहे. काँग्रेस हायकमांडच्या मनात पुण्यासंदर्भातील कुठलाही निर्णय घेणे असो किंवा अमुक तमुक कार्यकर्त्याला पद देणं असो, कलमाडींच्या मांडवाखालूनच हायकमांडला जावे लागायचे.

"मी जगात कुठेही असो, पुण्यातील वर्तमानपत्रे दररोज सकाळी आठ वाजता मला वाचायला मिळालीच पाहिजे" असा दंडक त्यांनी आपले पीएला घालून दिला होता.

असंख्य किस्से, आठवणी यांची पोतडी आज त्यांचं छायाचित्र पाहून माझ्या स्मृतीतून बाहेर येऊ लागल्या.

माणसाच्या जीवनात कधी काय होईल ? याचा नेम नाही.

राष्ट्रकुल घोटाळा उघडकीस आला आणि कलमाडींना जेलमध्ये जावं लागलं, कलमाडी अस्ताला तिथूनच सुरुवात झाली. १९९० च्या दशकात पत्रकारिता करत असताना हा माणूस मला नेहमी वाचायला आवडायचा. कलमाडींच्या मुलीच्या लग्नाला पुण्यात अमरसिंह बरोबर आलेल्या अमिताभला 'लेट का आलास..? म्हणून रागावलेले कलमाडी मी विसरूच शकत नाही. तर पुण्यातील पंचतारांकित हॉटेल 'ली मेरिडियन' मध्ये एका बिझनेस कॉन्फरन्समध्ये ....मुकेश....अशी एकेरी हाक अंबानींना मारलेले कलमाडी मला विसरणे अशक्यच....

सुरेशभाईं बद्दलचे जे लिहिले आहे ते सत्यकथन आहे ..लिहिणाऱ्याने नाव नाही टाकले खाली.

खरंच खूप मोठ्या मनाचे आहेत सुरेश भाई मी अत्यंत जवळण हे बघितले आणि अनुभवले. मला साहेबां कडे पहिल्यांदा घेऊन जाणारे सुरेशभाईच. फोटो बघून नकळत डोळे पाणावले. आता अशी माणसं दुर्मीळ आहेत. वो दौर हि कुछ और था ..!!!!!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# श्रावण सौंदर्य बहरलं अजिंठा लेणीत !!

आधुनिक केसरी



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

**गेल्या वर्षभरापासून सारी पर्यटन स्थळाची द्वारे बंद होती. यंदा ती उघडली गेलेली आहेत. पावसाने श्रावण मासाची सुरुवात छान केलेली आहे त्यामुळे औरंगाबाद परिसरातील सर्व पर्यटन स्थळे श्रावणात बहरुन आलेली आहेत. औरंगाबाद मध्ये नित्यनेमाने हजारो पर्यटक येतात. मराठवाड्याचं थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखलं जाणार म्हैसमाळ... खुलताबादचा प्रसिध्द किल्ला... वेरूळच्या लेण्या आणि बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिर.. छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी राजे भोसले यांची गडी.. २१ गणेश पीठांपैकी १७ पीठ श्री लक्षविनायक गणपती.. म्हैसमाळची गिरीजादेवी ..जवळचेच बालाजीचे खूप सुंदर मंदिर.. बीबी का मकबरा.. पानचक्की.. अशी एक ना दोन औरंगाबाद जवळील अगणित पर्यटन स्थळांचे श्रावण महिन्यामध्ये याठिकाणचे निसर्ग सौंदर्य बहरुन आलेलं आहे...**

औरंगाबाद शहरापासून १०५ किलोमीटर अंतरावर असणारे हे अजिंठा गाव आणि त्या ठिकाणी असणारी संपूर्ण जगातील प्रसिद्ध असली अजिंठ्याची लेणी वाघुर नदीच्या काठावर ही वसलेली आहे. या नदीच्या काठावर अजंठा लेणीचा आकार बघितला तर एखाद्या घोड्याच्या नालाच्या सारखा असावा अशा आकारात ही लेणी वसलेली आहे..

श्रावणमासात अजिंठा लेणीच्या परिसराला तर निसर्ग देवतेचा परिसस्पर्श झालेला आहे. साऱ्या डोंगरांच्यावर जणू हिरवेगार गालिचे पसरलेले आहेत. डोंगरावरुन खळखळतं येणारे झरे... पाहून असे वाटतं जणू त्या डोंगरावरुन दूधाच्या कासंड्याच ओतलेल्या आहेत की काय.. अशा हिरव्यागार बहरलेल्या डोंगरातून फिरताना होणारा आनंद विलक्षणच असतो. मध्येच पक्षांचा किलबिलाट तर कधी कोकिळेचा स्वर कानावर येतो नी मनं सुखावून जाते.टपटप करत पानावरुन ओघळणारे पाण्याचे थेंब... वाऱ्यांच्या झुळके बरोबर अंगावर येणारे पाण्याचे थंडगार तुषार... अजिंठा लेण्या जवळील सप्तकुंडाचा तो धबधबा तर डोळ्यांचे पारणे फिटेल इतका मनमोहक.. विलोभनीय असाच आहे... सारंच आनंददायी नी सुखावून टाकणारं. समोरच्या डोंगरावर इंद्रधनुषानी आकाशात बांधलेलं ते तोरण पाहून मनं आनंदून गेल्यास नवल ते काय...असं अलौकिक निसर्ग सौंदर्य न्याहाळत येतो तो पिंपळदरी जवळील व्ह्यू पॉइंटवर आपणं येतो..या ठिकाणी तुरळक गर्दी पर्यटकांची असते. घोड्याच्या नालाच्या आकाराचे हे अजिंठा लेणी चे दर्शन किती विलोभनीयं असते हे शब्दांमधून सांगता येत नाही.या व्ह्यू पॉइंट वरुन खाली पायवाटेवरून उतरताना श्रावणातील बहरलेले निसर्ग सौंदर्य पाहून मनं सुखावून जातं... तृप्त होऊन जाते...

आमच्या भटका तांडाचे सर्वेसर्वा श्रीकांत उमरीकर तसेच आमच्या धमाल ट्रेकर्सचे रविंद्र बिंदू यांनी आमच्या ग्रुपला बाजूला घेऊन अजिंठा लेणी विषयी माहिती देण्यास सुरुवात केली... आमच्या सहलीचे सहल संयोजक आकाश ढुमणे हे तर सहलबस पासून नास्ता चहा कॉफी नी उत्तम भोजनाचीही व्यवस्था नेहमीच करतात. त्यामुळे श्रीकांत उमरीकर.. आकाश ढुमणे.. रविंद्र बिंदू यांचे ऋण व्यक्त करण्यासाठी माझे शब्दही अपुरे आहेत असंच मला नेहमीच वाटतं हेच खरं...

या संपूर्ण डोंगरावर २६ गुफांमध्ये ही लेणी बांधली गेलेली आहे. संपूर्ण लेण्या प्रामुख्याने बौद्ध लेण्या आहेत. दोन टप्प्यात या लेण्या बांधल्या गेलेल्या आहेत. पहिल्या टप्प्यात सातवाहन राजवटीच्या काळात तर दुसऱ्या टप्प्यात वाकाटक राजवटीच्या काळात बांधलेल्या आहेत. युनेस्कोनी अजिंठा लेण्यांना जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले आहे.

अजिंठा लेण्यांना १८१९ साली घोडदळातील एक ब्रिटिश अधिकारी जॉन स्मिथ हा वाघाच्या शिकारीसाठी जंगलात आलेला होता त्यावेळी अचानक त्याच्या नजरेला या अजिंठा गुंफां दिसल्या. त्यानंतर त्यांनी त्यांच्या सैनिकांना सांगून गुंफाकडे जाण्यासाठी रस्ता बनवून घेतला. अजिंठा लेण्यांमध्ये भगवान गौतम बुद्धांचे जीवन.. गौतम बुद्धांची शिकवण अलौकिक पेंटिंग मधून त्याची उकल केलेली आहे. लेण्यातील नयनरम्य विलोभनीय पेंटिंग पाहून आपणं भारावून जातो. त्या काळातही भारतीय संस्कृती किती विकसित होती हेच या प्रत्येक पेंटिंग मधून... प्रत्येक शिल्पातून दिसून येते. त्याकालखंडातील स्त्रियांनी परिधान केलेली आभुषणे..त्यांची सुंदर वस्त्रप्रवरणे... मनमोहक केशरचना आजच्या आधुनिक काळातील महिलांनाही नक्कीच भुरळ पाडतील इतक्या मनमोहक आहेत. अजिंठा.. वेरुळ.. आणि जवळची सर्व पर्यटन स्थळे असंख्य वेळा पाहिलेली आहेत.

औरंगबाद मधिल एका मोठ्या दैनिकानी सिटी वॉकच्या प्रत्येक महिन्याला दाखविण्याचे आयोजन केले होते.औरंगाबादच्या इतिहास तज्ञ डॉ.प्रा.दुलारी कुरेशी नी त्यांचे मिस्टर सर्व इतिहास प्रेमींनां प्रत्येक लेणीतिल दालनाचे महत्व खूप सुंदर विषद करुन सांगत असतं. मुगलं.. मराठ्यांचा संपूर्ण इतिहास डोळ्यासमोर उभा करीत असतं. अजिंठा लेण्यांमधील स्त्रियांच्या विषयी विश्लेषण करून सांगतांना डॉ.दुलेरी कुरेशी म्हणाल्या. मुघल ..मराठा काळातील स्त्रियां किती सुंदर.. संपन्न होत्या ते अजिंठ्याच्या पेंटिंग मधून लक्षात येते. त्या स्त्रियां किती नखरेल होत्या ते पहा... गळ्यातील दागदागिने.. कर्णफुले.. झुमके.. त्यांच्या हेअर स्टाईल तर पहा तुम्ही आज फॅशन म्हणून मिरवता... पणं कित्येक वर्षांपूर्वीच्या स्त्रियां किती फॅशनेबल होत्या ते या अजिंठा गुंफां मधिल पेंटिंग मधून लक्षात येते...

अजिंठा लेण्यांमध्ये एकूण ३० लेण्या आहेत. त्यामध्ये २४ बौद्ध विहार आहेत तर ५ हिंदूची मंदिरे आहेत. या गुंफामध्ये १, २, ४, १६, १७ या नंबरच्या गुंफा सर्वात सुंदर गुंफा आहेत. साधारणपणे इंग्रजी यु आकारातील मोठ्या खडकांवर या ३० गुंफा खोदण्यात आलेल्या आहेत. त्यांची उंची ही साधारणता ७६ मीटर इतकी उंच आहे. यावरुन त्यांची भव्यता आपणास सहजतेने लक्षात येते. अजिंठा लेण्यांचा इतिहास आपण समजुन घेतला तर त्या कालखंडात या संपूर्ण लेण्यांचा वापर बौद्ध मठ म्हणून केला जात असे. या गुंफा मध्ये एकांतात बौद्ध विद्यार्थी आणि बौद्ध भिक्षू यांना बौद्ध धर्माची दीक्षा.. शिकवण दिली जातं असे. निसर्गाच्या सान्निध्यात.. एकांतात बौद्ध विद्यार्थी.. भिक्षू आपल्या धर्मांच्या विषयीचे चिंतन मनन किती सुंदर रितीने करीत असतील हे या गुंफांच्या रचनेवरून दिसून येते.

अजिंठा लेण्यांमध्ये चैत्य गृहात सुंदर चित्रे रेखाटली आहेत तसेच या लेण्यांमध्ये अतीशय सुंदर छतांवरुनही अलौकिक नक्षीकाम कलाकुसर केलेली आहे. तर या चैत्य गृहात मोठ्या खिडक्या देखील आपणांस दिसून येतात. पहिल्या उत्खननात सापडलेल्या लेण्या दख्खन, कोंडदेव, पितळखोरा, या सर्व लेण्या नाशिक येथे सापडलेल्या लेण्या सारख्या आहेत. या लेण्या बनविण्याचा दुसरा टप्पा हा चौथ्या शतकात सुरू झालेला होता जो वाकाटकांच्या राजवटीत बांधला गेला. दुसऱ्या टप्प्यात बांधल्या गेलेल्या गुंफा सर्वात सुंदर नी अत्यंत कलात्मक कौशल्यपूर्ण आहेत. शिवाय या गुफांमध्ये अतिशय सुंदर अलौकिक सौंदर्याची अनुभूती देणारी चित्रे रेखाटली गेलेली आहेत. जी आजच्या चित्रकारांना ही भुरळ पाडतील इतकी अप्रतिम आहेत हे बाकी खरं...

अजिंठा लेण्यांचे इतकं विलोभनीय सौंदर्य पाहून आपणं नक्कीच भारावून जातो.. मग आपल्या मनात देखील आपणास पहावयास कधी यायचं असा विचार नक्कीच आला असेल तर... साधारणपणे ऑक्टोबर ते फेब्रुवारी हा कालावधी अजिंठा लेण्यांमध्ये येण्यासाठी चांगला आहे बरका...कारण औरंगाबाद शहरातील तापमान त्याकाळातील थंड असते.अजिंठ्यात पाऊस मोठ्या प्रमाणात पडतं असतो नी उन्हाळ्यात ४० डिग्री पेक्षा तपमान असते. वर्षभर खुल्या असणाऱ्या या अजिंठा गुंफां प्रत्येक सोमवारी बंद असतात हे लक्षात घेऊन येण्याची आखणी करायला हवी.अजिंठा लेण्यांना आपण सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भेट देऊ शकता.

अजिंठा लेण्यांना भेट देण्याकरता आपणं औरंगाबादहून १०५ किलोमीटर अंतरावरील अजिंठ्याला बसनी.. कारनी अजिंठालेणी पर्यंत जाऊ शकता..किवां जळगाव मधूनही रोड मार्गे अजिंठ्याला येऊ शकता. मग काय कधी येताय अजिंठा.. वेरुळ पाहण्यासाठी. आज श्रावणमासात लेण्यांजवळील निसर्ग सौंदर्य नयनरम्य असं बहरलेलं आहे... हाच निसर्ग आपणांस सारख्या रसिकांची आतूरतेनी वाट पाहत आहे... हो ना...

# श्रावणातील पावसाची वैशिष्ट्ये

आधुनिक केसरी

**मराठी बारा महिन्यांमध्ये श्रावण महिन्याला विशेष महत्त्व आहे. श्रावण महिना हा अत्यंत पवित्र महिना मानला जातो. या वर्षी म्हणजेच सण 2022 सालामध्ये श्रावण महिना 29 जुलैपासून सुरूवात झाली आणि त्याच्या चाहुलीचे संकेत निसर्गाने द्यायला सुरुवात केली आहे. वातावरणामध्ये बदल जाणवायला लागलेले आहेत.**

तसे बघितले तर प्रत्येक महिन्यातील वातावरण हे वेगवेगळे असते, परंतु श्रावण महिन्यातील वातावरणाची मजा फार वेगळी असते. निसर्गामध्ये एक वेगळ्या प्रकारची उमेद आणि उत्साह या महिन्यामध्ये वाहताना दिसतो. घराघरांमधून सुगंधी अगरबत्ती यांचा वास दरवळत असतो. श्रावण महिन्यामध्ये विविध प्रकारचे व्रतवैकल्य यामध्ये स्त्रिया व्यस्त दिसतात. नवीन साड्या कपडे तरुण मुली ड्रेस घालून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होताना दिसतात. श्रावण महिन्यामध्ये सोमवारी शाळांना अर्धी सुट्टी असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही श्रावण महिना नेहमीच लक्षात राहतो. माणसाच्या एकंदरीत जीवनावर फार मोठ्या प्रमाणात श्रावण महिन्याचा परिणाम होत असतो त्यामुळे तो नेहमीच लक्षात राहतो.

श्रावण महिन्यामध्ये येणारा पाऊस म्हणजे अगदी लहान मुला सारखा असतो. लहान मुलांच्या मनात कधी कोणते विचार येतील किंवा ते कसे वागतील हे अजिबात सांगता येत नाही. अगदी तसेच श्रावण महिन्यामध्ये कधी पाऊस येईल आणि कधी ऊन पडेल हे सांगता येत नाही. ऊन सावलीचा खेळ हा सतत चालूच असतो. श्रावण महिन्याचे वर्णन करणारी कविता तुम्हाला माहीतच असेल,"श्रावण मासी हर्ष मानसी....."अगदी मनाला स्पर्श करून जाते. श्रावणातील पाऊस म्हणजे अचानक पावसाच्या सरी कोसळू लागतात तर लगेच पुढच्या क्षणाला ऊनही पडते. ऊन सावलीचा हा खेळ चालूच असतो. निसर्गालाही लपंडाव खेळ खूपच आवडतो असे वाटू लागते.

श्रावण महिन्याचे वर्णन करताना मला एक गाणे आठवते ते असे की,

"हसरा नाचरा जरासा लाजरा
सुंदर साजिरा श्रावण आला"

श्रावण महिन्यातील ऊन अत्यंत कोवळे व सुकुमार असते. श्रावण महिन्यातील ऊन ज्यांना सोसणार नाही त्यांना अगदी नाजूक म्हटले पाहिजे. उन्हाप्रमाणे श्रावण महिन्यातील पाऊस देखील अत्यंत साधा व मनमोहक असतो. पावसाच्या जोरदार सरी नंतर अचानक ऊन पडू लागते.

श्रावण महिन्यात निसर्ग आपल्या विविध रूपांचे दर्शन घडवत असतो. कधीतरी अचानक आकाशामध्ये इंद्रधनुष्याचे दर्शनही घडते. आपल्या अनंत बाहूंनी निसर्ग सौंदर्याची बरसात करत असतो. श्रावण महिन्यामध्ये व्रतवैकल्य उपास-तापास यांची सुरुवात होते एक वेगळेच भक्तिभावमय वातावरण या महिन्यात निसर्गामध्ये निर्माण झालेले असते.

श्रावणातील ऊन सुद्धा अतिशय कोमल असते. असा हा सुंदर सुकुमार महिना कुणाला न आवडेल तर नवलच आहे. या महिन्यांमध्ये विविध सणांना आणि समारंभांना सुरुवात होते. वर्षभरातील हिंदुधर्माच्या सणांचे अनुक्रमाणिका केली तर श्रावण महिन्यालाच पहिला नंबर द्यावा लागेल. पावसाळा सुरू होऊन पंधरा-वीस दिवस एखादा महिना होतो आणि लगेच श्रावण महिन्याच्या आगमनाची चाहूल लागते. झाडांना नवीन पालवी फुटून धरणी नवीन हिरवा शालू पांघरते असे वाटते. गवताच्या पात्यावर दवबिंदू किंवा पावसाचे बिंदू गोळा झालेले असतात. अचानक चालणाऱ्या ऊन-पावसाच्या खेळामध्ये ऊन आले की यादव बिंदूंवर हे उन्हाचे किरण पडल्यानंतर अचानक कुठून तरी मोदी चमकावा असेच वाटू लागते.

# राजेश पाटील यांच्या आव्हानात्मक कामाची 'मोर ओडिशा डायरी'



डॉ.बबन जोगदंड
संपर्क क्र. 9823338266

आधुनिक केसरी


**"ताई मी कलेक्टर व्ह्यनू" या अत्यंत गाजलेल्या पुस्तकाचे लेखक, सध्या पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त असलेले राजेश पाटील यांनी 'मोर ओडिशा डायरी" हे पुस्तक लिहिले आहे. एका तरुण आयएएस अधिकाऱ्याने ओडिसासारख्या अविकसित राज्यामध्ये उत्कृष्ट,दखलयोग्य कामगिरी बजावलेली आहे.त्यांनी तिथे काम करताना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत तिथल्या अनोळखी असलेल्या जनतेशी नाविन्यपूर्ण कामाच्या माध्यमातून नाळ जोडून एक वेगळं नातं निर्माण केलं आहे. ते मूळ ओरिसा राज्यामध्ये नियुक्तीला आहेत, अलीकडे त्यांची प्रतिनियुक्तीवर पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त म्हणून नियुक्ती झाली आहे. या पालिकेच्या आयुक्त पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर महापालिकेतही जोरकस कामगिरी करून आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. महापालिकेत त्यांनी अत्यंत लोकाभिमुख उपक्रम सुरू केले आहेत. त्यामध्ये अत्यंत कौतुकास्पद ठरलेला निर्णय म्हणजे समाजाचा ज्या समूहाकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोन आहे त्या तृतीयपंथीय समूहातील काहींना महापालिकेत त्यांनी' सिक्युरिटी गार्ड' व तत्सम पदांवर नोकरीसाठी नेमले.**

त्यांच्या या निर्णयाचं कौतुक झालं आहे.त्यांनी महापालिकेत राबविलेले इतरही अनेक निर्णय पिंपरी चिंचवड करांच्या पसंतीस उतरले आहेत. अत्यंत प्रामाणिक, संवेदनशील व सामाजिक जाणिवेचे आणि स्वच्छ चारित्र्याचे सर्वसामान्यांचे अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी लिहिलेले हे पुस्तक पुण्याच्या समकालीन प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. याचं उत्तम संपादन सुहास कुलकर्णी यांनी केलं आहे. नुकतीच पाटील सर व माझी भेट झाली, तेव्हा त्यांच्या भेटीचा एक फोटो मी माझ्या फेसबुकवर अपलोड केला होता व त्यांना तो शेअर केला. त्या पोस्टवर ओडिसामध्ये त्यांना ओळखणाऱ्या अनेकांनी कमेंट्स केल्या की, पाटील सर आम्ही आपणाला' मिस' करतो आहोत.आपण ओडिसांच्या जनतेसाठी खूप उत्तम निर्णय घेतलेले आहेत,आपण खूप चांगले कलेक्टर होतात...

हे खरे आहे. त्यांनी ओरिसात संवेदनशील भावनेनं काम केलं आहे यावरून त्यांच्याप्रती तेथील जनतेमध्ये असलेला आदर लक्षात येतो. खरं तर प्रशासनामध्ये सनदी अधिकारी म्हणून काम करताना विविध पद्धतीचे अनुभव येतात. विशेषतः भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये अनेक पदांवर काम करता येऊ शकतं. त्या पदावर त्यांना वेगवेगळे अनुभव येत असतात. सगळेच अधिकारी त्यांना आलेले अनुभव शब्दबद्ध करत नाहीत किंवा ते पुस्तकस्वरूपात पुढेही आणत नाहीत. ते यायला हवेत. त्या अनुभवाचा नव्याने प्रशासनात येणाऱ्यांना व सध्या कार्यरत इतर अधिकाऱ्यांना खूप चांगला उपयोग होऊ शकतो. यापूर्वी अशाच पद्धतीचे एक डायरीवजा पुस्तक राज्याचे माजी मुख्य सचिव रत्नाकर गायकवाड सर यांनी 'विकास प्रशासनातील माझे नाविन्यपूर्ण उपक्रमः माझ्या रोजनिशितील निवडक उतारे' लिहिले होते. या पुस्तकाच्या चार आवृत्ती निघाल्या. त्यानंतर गडचिरोलीमध्ये ज्यांनी अधिकाधिक सेवा केली ते निवृत्त सनदी अधिकारी इ.झेड.खोब्रागडे सर यांनी 'प्रशासनातले समाजशास्त्र आणि 'आणखी एक पाऊल' हे पुस्तक लिहिले. याच्याही चार-पाच आवृत्ती निघाल्या. मला वाचनात आलेल्या अधिकाऱ्यांच्या पुस्तकांमध्ये लक्ष्मीकांत देशमुख सर, भारत ससाणे सर, विश्वास पाटील सर, सदानंद कोचे सर, शेखर गायकवाड सर,चंद्रकांत दळवी सर या अधिकाऱ्यांची पुस्तके खूपच प्रेरणादायी व वाचनीय अशी आहेत. त्याच धाटनीतील राजेश पाटील यांचे हे पुस्तक आहे.

या पुस्तकाचे जे शीर्षक आहे ते ओडिशी भाषेतील आहे. याचा मराठीत अनुवाद 'माझी ओरिसा डायरी' असा करता येईल. राजेश पाटील हे तरुण अधिकारी आहेत, तेथे त्यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी या आदिवासी, नक्षलग्रस्त भागात अत्यंत दमदार अशी कामगिरी केली आहे. तिथली बोलीभाषा शिकून लोकांना अधिकाधिक कशी मदत करता येईल, आपल्या पदाचा त्यांना कसा फायदा होईल, रोज येणारी वेगवेगळी आव्हानं पेलून लोकांच्या जीवनात कसा आनंद निर्माण करता येईल यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक विकसित केलेली कार्यप्रणाली समजून घेण्यासाठी त्यांची ही डायरी निश्चितच वाचायलाच हवी. या डायरीमध्ये अधिकाऱ्याच्या कर्तुत्वाचा त्यांच्या प्रामाणिकपणाचा त्यांच्या नव उपक्रमाचा त्यांच्या आव्हानांचा एक लेखाजोखाच आहे.

त्यांनी या डायरीमध्ये जवळपास १२ प्रकरणांचा समावेश केलेला आहे. सगळे प्रकरणे लक्षवेधी आहेत, त्यामध्ये मला सगळ्यात आवडलेले प्रकरण म्हणजे 'कलेक्टर सरांची मुलं', इतरही प्रकरणांची त्यांनी अनुभव समृद्ध मांडली आहे. त्यांचं ओडिसातील नोकरीच पहिलं वर्ष, आठगड मधला मुक्काम, दोन अवघड आव्हानं, आदिवासींना समजून घेताना, नक्षलवाद्यांशी थेट सामना, मयूरभंज नवा जिल्हा, नवी आव्हाने, मागे वळून पाहताना अशी ही प्रकरणे वाचताना ती संपूच नये, असं वाटतं, कारण त्यांनी या प्रकरणांमध्ये खूप बारकाईने त्यांना आलेले अनुभव मांडले आहेत, अनेक प्रसंगात त्यांनी लोकहिताचे कसे निर्णय घेतले याची मांडणी केली आहे. तिथले जीवनानुभव असतील, लोकांच्या समस्या असतील तेथील दारिद्र्य असेल, राहाणीमान असेल असे कितीतरी प्रसंग त्यांनी मांडले आहेत. या प्रत्येक प्रकरणांमधून आपण काहीतरी बोध घेऊ शकतो, काहीतरी नवा विचार शिकू शकतो व आपल्याला त्यांच्या अनुभवाची कामात मदत मिळू शकते असे त्यांचे अनुभव आहेत. कमी सेवेत त्यांना खूप समृद्ध करणारे अनुभव आले, हे पुस्तक वाचल्यावर कळते. खरं तर पाटील सर जळगाव जिल्ह्यातल्या एका छोट्याशा खेडेगावातून साध्या शेतकरी कुटुंबात जन्मलेले अधिकारी आहेत. लहानपणापासूनच त्यांनी कलेक्टर होण्याचं स्वप्न पाहिलं आणि आलेल्या सगळ्या अडचणींवर मात करत त्यांनी पद मिळवलं. या संघर्ष अनुभवावर'ताई मी कलेक्टर व्हयनू' हे पुस्तक २००८ साली प्रकाशित केलं. जवळपास चार- पाच भाषेमध्ये हे पुस्तक प्रकाशित झालं. या त्यांच्या पुस्तकाला प्रचंड लोकांनी डोक्यावर घेतलं, माझ्या मते त्याही पुढचं हे त्यांचं पुस्तक असावं. त्यांनी हे पुस्तक का लिहायला घेतलं याच्याबद्दल या पुस्तकाच्या प्रस्तावनात ते लिहितात,' सनदी अधिकारी म्हटले की, लोकांच्या डोळ्यासमोर एक साचेबद्ध प्रतिमा येते. त्यांना आलेशान घर, लाल दिव्याची गाडी, लवाजमा असं समीकरण लावलं जातं पण प्रशासकीय अधिकाऱ्यांची कामं, त्यांच्यासमोरील आव्हानं, त्यांच्यासमोर असलेला संघर्ष हे लोकांना समजत नाही, दिसत नाही केवळ अपुरी माहिती या आधारावर लोक अनुमान काढतात आणि म्हणून त्यांना या सेवेमध्ये काय काय अनुभव आले या अनुभवाची जाणीव लोकांना व्हावी त्यातून त्यांचं अनुभव विश्व समृद्ध व्हावं म्हणून त्यांनी हे पुस्तक लिहिलं आहे. खरं तर बरेच अधिकारी सेवानिवृत्तीनंतर अशी पुस्तके लिहीत असतात. माझ्या मते नोकरीमध्ये असताना फार कमी अधिकारी आहेत की, त्यांनी असे अनुभव लिहिले असावेत. पाटील सर यांनी जे काम केलेलं आहे त्यातील अनुभव अत्यंत प्रेरणादायी, अत्यंत ऊर्जादायी आणि आपल्या मनातील संभ्रम दूर करून एक नवी ऊर्जा, एक नवा आशावाद आपल्या मनात पेरतील असे त्यांचे अनुभव आहेत.




या पुस्तकात अनेक रोमांचक, अनेक प्रेरणादायी व अनेक संकटात्मक, आव्हानात्मक प्रसंग त्यांनी रेखाटले आहेत ते वाचूनही आपल्याला त्यांच्या कामाची, त्यांच्या संवेदनशील मनाची व त्यांच्या प्रामाणिकतेची प्रचिती येऊ शकते. त्यांनी मयूरभंज या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून अत्यंत नाविन्यपूर्ण व लोकांच्या हिताचे व लोकांच्या मनातले निर्णय घेतले. त्यामुळे तिथली लोक त्यांचं आजही कौतुक करतात, त्यांना तिथे पुन्हा येण्याची विनंती करतात. तिथे आदिवासींसाठी वन हक्क जमिनीचे वाटप असू द्या, आरोग्याच्या सुविधेसाठी 'आरोग्य प्लस' या नावाने एक मोबाईल हेल्थ युनिट सुरू केलं त्याचं काम असो, दोरखंडापासून शोभेच्या वस्तू तयार करून महिलांना उन्नत करण्याचा प्रकल्प असो, बाल कामगारांना मुक्त करून त्यांना दोन वर्ष व्यावसायिक प्रशिक्षण देणं असो तेथील लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी सुरू केलेला तक्रार निवारण दिन असो.

त्यांनी तिथे जिल्हाधिकारी म्हणून काम करताना आपल्या कामाची गरज नेमकी कोणाला आहे याचा विचार करून त्यांना न्याय देण्याचं मौलिक कार्य केलं आहे. त्यांनी या जिल्ह्यामध्ये सुरू केलेला एक वेगळा उपक्रम 'कलेक्टर सरांची मुलं' या प्रकरणांमध्ये लिहिला आहे.तो काय आहे हे पुस्तक वाचल्यावरच कळेल. पुस्तकांमध्ये अनेक प्रसंग आहेत ते जागेअभावी येथे मांडता येणार नाहीत. पण मी एक आवाहन करीत आहे की, निश्चित हे पुस्तक आपण वाचायला हवं. ओरिसामधील जीवनमान समजून घ्यायला हवं व राजेश पाटील सर यांची उत्तम कामगिरी जाणून घ्यायला हवी एवढंच....!

# ऑगस्ट क्रांती दिन चिरायू होवो!



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**खरं तर नऊ ऑगष्ट हा क्रांती दिन म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. पण असे असले तरी या दिवसासाठी आठ ऑगस्टलाही जास्त महत्व आहे.याच दिवशी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने मुंबईमध्ये एक प्रस्ताव पारित केला. त्या प्रस्तावानुसार नऊ ऑगस्टपासून आपण चलेजाव भारत छोडोचं आंदोलन करु असं ठरलं. प्रत्येक नेत्यांनी रस्त्यावर उतरुन अहिंसक मार्गाने स्वातंत्र्याचा उठाव करु असं ठरलं. त्याला कारणंही तसंच होतं.**

भारताला स्वातंत्र्य सहजासहजी मिळालं नाही,त्यासाठी इथे भारतीय नेत्यांना फार मोठा त्याग करावा लागला.कित्येक क्रातीकारक लढले. शहीद झाले. काहींची नावं इतिहासात नाहीत. काहींची आहेत. पण जे जे या देशासाठी लढले. त्यांच्या प्राणांच्या बलिदानाचा इतिहास भारत देश विसरू शकत जरी नसला तरी आजही काही लोकं त्यांना शिव्या हासडतांना दिसतात. ही या देशाची शोकांतिका आहे. निदान आपण तरी या देशाच्या स्वातंत्र्यासाठी काही करु शकलो नाही. आताही करण्यासारखे असूनही करु शकत नाही. हे सगळं विसरुन त्यांना शिव्या देण्याचं नव्हे तर बदनाम करण्याचं काम नेहमी काही लोकं करीत असतात.

१९३९ ला द्वितीय महायुद्ध सुरु झालं. त्या महायुद्धात जर्मन फौजांनी इग्लंडवर सरशी केली. त्यावेळी येथील भारतीय नेत्यांना इंग्रजांनी म्हटलं होतं की तुम्ही आम्हाला मदत करा. बदल्यात आम्ही तुम्हाला स्वातंत्र्य देवू.पण ज्यावेळी युद्ध संपलं, तेव्हा त्या इंग्रजांनी भारतीयांना दगा देत त्या स्वातंत्र्य देण्यापासून माघार घेतली. त्यामुळं पर्यायानं भारतीय नेत्यांची मनं नाराज झाली. म्हणून त्यांनी चलेजावचा उठाव करण्याचं ठरवलं.

या संदर्भात आठ ऑगष्टला भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची बैठक होण्यापुर्वी त्याच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची बैठक चार ऑगष्टला झाली. आपल्याला इंग्रजांनी धोका दिला या विषयावर ती बैठक होती. आपण अहिंसक मार्गानं उद्या रस्त्यावर उतरु हेही विषय होते. परंतू याला बैठकीतील काही लोकांची सहमती झाली नाही.त्यातच काँग्रेसचे जेष्ठ नेते सी राजगोपालाचारी यांनी याच विषयाच्या संदर्भात पार्टी सोडली. त्यामुळं चार ऑगष्टला झालेली बैठक निष्फळ झाली. त्यामुळं त्याच्याच चार दिवसानं म्हणजे आठ ऑगष्टला परत बैठक भरली. तिही याच विषयावर.

या बैठकीतही हाच विषय होता. पण याही बैठकीत हिंदू महासभा, मुस्लिम लीग व भारतीय कम्युनिस्ट पक्षीने विरोध केला.त्यांचं म्हणणं होतं की अहिंसक मार्गानं जरी आपण आंदोलन करीत असलो तरी इंग्रज आपल्याला सोडणार नाहीत.ते आंदोलन दडपवून टाकण्यासाठी बळाचा वापर करतील गोळ्या झाडतील. मग त्यात कित्येक भारतीय लोकं मरतीय.म्हणून हो आंदोलन नको. पण आंदोलन जर केलं गेलं नाही तर या देशातून इंग्रज कधीच जाणार नाही असं तत्कालीन भारतीय नेत्यांना वाटत असल्यानं त्यांनी काही संघटनांचा विरोध होवूनही आंदोलन छेडलं. आठ ऑगष्टला प्रस्ताव पारित झाला व नऊ ऑगष्टला आंदोलनाला सुरुवात झाली.

हे आंदोलन भारतीयांसाठी नवं नव्हतं. यापुर्वीही दहा मे १८५७ ला देशात असंच आंदोलन झालं होतं. तो १८५७ चा राष्ट्रीय उठाव म्हणून प्रसिद्ध आहे.यात बहादूरशहा जफर, नानासाहेब, राणी लक्ष्मीबाई, झलकारीबाई व तात्या टोपे यांचे विशेष योगदान आहे.तो इतिहास येथील भारतीयांना माहित होता. तसेच तंट्या भील उर्फ भीमा नायक, चंद्रशेखर आझाद, भगतसिंह, राजगूरू, सुखदेव यांना देश विसरला नव्हता. त्यांनी केलेलं प्राणांच बलिदान येथील भारतीयांच्या रक्तात होता. याच बलिदानाचा इतिहास आळवू आळवू देश गांधीजींच्या नेतृत्वात एकत्र झाला होता. मग कित्येक नेते लढले. नेत्यांची धरपकड होताच साता-यात नाना पाटील, नागपूरमध्ये मगनलाल बागडी,सेलोकर गुरुजी यांनी मोर्चा सांभाळला. तसेच यामध्ये बरीच मंडळी शहीदही झाली. तसेच चिमूरमध्येही बरीच मंडळी शहीद झाली.

१८५७ ते १९४२ पर्यंतचा इतिहास रक्तरंजितच होता.कित्येक भारतीय अहिंसक मार्गानं जरी इंग्रजांचा विरोध करीत असले तरी ते गोळ्या झाडत असत.सायमन कमीशनमध्ये लाला लजपतराय यांनी सायमन गो बैक म्हणत मिळवणूक काढताच त्यांना लाठीमार करुन घायाळ केलं होतं,त्यातच त्यांचा मृत्यू झाला. जालियनवाला बागेतही तेच घडलं.म्हणून आठ ऑगष्टला झालेल्या बैठकीत प्रस्ताव पारित झाल्यानंतर करो या मरो असा आदेश देत नेत्यांनी चलेजाव भारत छोड़ो चं आंदोलन छेडलं.ही भारतीयांची इंग्रजांना एक चपराकच होती.

प्रस्ताव पारित होताच व उद्या आंदोलन छेडणार आहे हे माहित होताच इंग्रजांनी येथील भारतीय नेत्यांना कैद केलं. महात्माजींना पुण्याला आगाखान पैलेसमध्ये ठेवलं. नेहरू तसेच इतर नेत्यांनाही पकडून देशातल्या वेगवेगळ्या तुरुंगात ठेवलं. तेव्हा महात्मा गांधी म्हणाले की आता प्रत्येकजण नेता आहे. इंग्रजांना घाबरु नका. प्रतिकार करा. स्वतःला स्वतःचा नेता समजा.

शेवटी नऊ ऑगष्टपासून सुरु झालेल्या अहिंसक आंदोलनाला पांगविण्यासाठी इंग्रज सैनिकांनी निरपराध भारतीयांवर जालियनवाला बागेसारखा गोळीबार केला.त्यात निरपराध माणसे मरण पावली. कित्येक आंदोलन करणारी आणि न करणारीही. त्यामुळं चिडून जावून येथील भारतीय लोकांनी टेलिफोनच्या तारा तोडल्या.कित्येक पोलिसठाणे जाळले. सरकारी इमारती जाळल्या. कित्येक लोकं भुमीगत झाले. यात कित्येक विद्यार्थीही शहीद झाले.

जेव्हा ही घटनेची माहिती महात्मा गांधींना झाली. त्यांनी तुरुंगातच एकवीस दिवसाचं उपोषण केलं. त्यातच त्यांचं स्वास्थ बिघडलं. त्यातच ते मरण पावतील व पुन्हा देशात रोष वाढेल याचा विचार करुन इंग्रजांनी त्यांना १९४४ मध्ये तुरुंगातून सोडले.

आंदोलन यशस्वी झाले नाही. मग काय भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला हिंदू महासभा, वामपंथी दल व मुस्लिम लीग नावे ठेवू लागली.पण महत्वाचं सांगायचं झाल्यास १९४२ चं आंदोलन यशस्वी जरी झालं नसलं, १८५७ सारखं....तरी त्या झालेल्या आंदोलनातून इंग्रजांना एक शिक मिळाली. ती म्हणजे आता या देशातून गेल्याशिवाय उपाय नाही. त्यांनी त्यानंतर वेगवेगळ्या बैठका घेतल्या.ज्यांनी या आंदोलनाला मदत केली नाही. त्यांनाही विचारणा करुन शेवटी भारताला स्वातंत्र्य देण्याचा निश्चय केला. त्यात काही अटीही टाकल्या. बहुतेक आजही कोहीनूर भारताचा हिरा इंग्लंडमध्ये आहे. शंकुतला एक्सप्रेसचे पैसे आजपर्यंत इंग्लंडला जात होते. कदाचित अशाच तर अटी नव्हत्या इंग्रजांच्या की त्यांनी भारताला स्वातंत्र्य दिलं.

# अन्न सुरक्षा सप्ताह : काय खावे, काय खाऊ नये याबद्दल टिप्स

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

आधुनिक केसरी

**जंकचे शब्दश रूपांतर केल्यास त्यास निरुपयोगी असे म्हटले जाते. त्यामुळे जंक फूडला पर्यायाने शरीरास निरुपयोगी अन्न असे देखील म्हणता येईल, जंक फूडची चव मुलांना आवडते कारण त्यामध्ये तेल, मीठ आणि साखर यांचा जास्त वापर केलेला असतो. मुळ कच्च्या पदार्थाचे तंतुमय पदार्थ (fibres) कमी केले जातात. ज्यामुळे चव आणखी चांगली वाटते उदा. मैद्याचे पदार्थ हे अन्न पदार्थ चवीला अन्न पदार्थ तयार करताना त्यामध्ये आकर्षक अन्न रंग आणि फ्लेवर्स (सुगंध), अन्नसंरक्षक (preservatives), अपमित्र के mubifiers, इत्यादी यांचा वापर केला जातो. त्यामुळे सर्वच जण अश्या अन्नपदार्थाकडे आकर्षित होतात, पण मुले आणि तरुण वयाची मुले आणि मुली यांना हे पदार्थ जास्त आवडतात.**

**जंक फूड चे लहान मुलांवर होणारे दुष्परिणाम**

(१) रोग प्रतिकार शक्ती कमी होते. वाढत्या वयात मुलांना योग्य पोषण मिळणे गरजेचे असते. पोषण मिळाले तरच त्यांच्या शरीराची योग्य वाढ होते आणि शरीर बळकट होते, परंतु जंक फूडच्या अतिरेकी सेवनामुळे मुलांना अन्नाचे सर्व पोषक घटक मिळत नाहीत. त्यामुळे त्यांची रोग प्रतिकार शक्ती कमी होते.

(२) थकवा व अळस वाढतो. जंक फूड भरपेट खाल्ल्यास दिवसभर आळस वाटतो, झोप येते. अन्न पदार्थ चविष्ट लागत असल्यानं जास्त खाल्ले जातात. त्यामुळे पोट गच्च होतं. शरीराला जडपणा जाणवतो, उत्साह जाणवत नाही. शरीर मनाला ऊर्जा मिळत नाही.

(३) मेंदूच्या ग्रहण शक्तीवर विपरीत परिणाम - HIPPOCAMPUS हा मेंदूचा संदेश ग्रहण करणारा आणि देणारा आवश्यक घटक आहे. तो स्मरणशक्ती आणि मानवी भावना नियंत्रित करतो. एका संशोधनानुसार जंक फूडच्या अती सेवनामुळे HIPPOCAMPUS वर विपरीत परिणाम होतो जसे आकलन शक्ती कमी होते. मुले चिडचिडी होतात मुलांची एकाग्रता कमी होते.

४) पचन शक्ती कमी होते : जंक फूड मध्ये फायबरचं प्रमाण अत्यंत नगण्य असतं. यामुळे से खाल्ल्यानं पचनक्रिया बिघडू शकते. जंक फूड खाल्ल्यानं चयापचय क्रियेचा वेग मंदावतो. याचा परिणाम म्हणजे बध्दकोष्ठतेचा त्रास होतो. त्यामुळे लहान मुलांना पोटदुखी, पोट फुगणे, पोटात गॅसेस, ॲसिडिटी, छातीत जळजळ, अपचन यासारखे त्रास होतात.

५) लठ्ठपणा - जंक फूडमध्ये साखर अथवा तेल यांचे प्रमाण जास्त असल्यामुळे ते खाल्ल्यामुळे शरीराला खूप जास्त कॅलरीज मिळतात त्या शरीरात व पेशींमध्ये फॅट्सच्या रूपात संचय होत राहतात त्यामुळे मुले स्थूल होऊ लागतात. त्यामुळे हाडे आणि सांधे यावर दाब वाढून लहान वयात सांधेदुखी होते आणि हाडे दुखू लागतात.

६) किडनीचे विकार जडू शकतात : चिप्स, फ्रेंच फ्राइज व तत्सम अनेक पदार्थात मिठाचा अतिरिक्त वापर आणि प्रक्रिया करून तयार केलेल्या अन्न पदार्थोंमुळे शरीरातील सोडीयम पोटॅशिअम यांचे आणि संप्रेरकांचे संतुलन बिघडते जंक फूड मधील घटकांमुळे रक्तात टाकाऊ आणि विचारी पदार्थ तयार होतात ते बाहेर टाकण्याचे काम किडनीला करावे लागते, ताण वाढल्यामुळे किडनीची कार्यक्षमता कमी होते आणि किडनीचे आजार जडतात.

(७) तरुणांमध्ये नैराश्य वाढते - तारुण्यात येताना होणाऱ्या हार्मोनल बदलामुळे सतत वर्तवणुक यांत बदल होत असतात. संतुलित आहारामुळे शरीरात हार्मोन्सचे कार्य सुरळीत राहते. मात्र जंकफूडच्या सेवनाने आवश्यक असलेल्या पोषणद्रव्यांचा अभाव निर्माण झाल्याने तरुणांमध्ये नैराश्य वाटते असे संशोधनातून समोर आले आहे.

(८) जंक फूडचे व्यसन लागू शकते : साखरयुक्त गोड जंक फूड खाताना जीभेला चव लागत असते. तसा संदेश मेंदूपर्यंत जात असतो आणि मेंदूला आनंद आणि आराम देणारे डोपामाइन नावाचे द्रव स्त्रवते, त्यामुळे असे पदार्थ वारंवार खाण्याचा संदेश मेंदू प्रत्येक वेळी देत असतो आणि असे पदार्थ खाण्याची इच्छा




निर्माण होते. त्यामुळे जंक फूडचे व्यसन लागू शकते.

९) मधुमेहाची (TYPE 2 DIABETES) शक्यता वाढते : जंकफूड सेवनामुळे शरीरात रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते. रक्ताची साखर नियंत्रित करण्याचे काम इंस्यूलीन या संप्रेरकास करावे लागते. परंतु जंक फूडच्या अति सेवनामुळे इन्सुलिन संप्रेरकावर विपरीत परिणाम होऊन त्याचे कार्य मंदावते किंवा बंद पडते. त्यामुळे TYPE 2 मधुमेह होऊ शकतो.

१०) रक्तदाब आणि हृदयरोगाचा धोका : जंकफूडमधील अतिरिक्त सोडियममुळे (SODIUM) रक्तदाब वाढतो. त्यामुळे रक्ताभिषरणावर विपरित परिणाम होतो. जंक फूड तयार करताना वनस्पती तूप किंवा मार्गारीन (बेकरी पदर्थांसाठी)यांचा वापर केला जातो. त्यामध्ये ट्रान्सफॅट हा हृदयाला हिनकारक पदार्थ असतो. मांसाहारी जंक फूडच्या अति सेवनामुळे रक्तातील BAD कॉलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढते. अन्नपदार्थ तळण्यासाठी वारंवार एकाच तेलाचा वापर झाल्यास तेलाचे TOTAL POLAR COMPOUNDS जास्त होतात आणि अन्नपदार्थात ट्रान्सफॅटचे प्रमाण वाढते. या सर्वाचा परिणाम हृदयावर दाब वाढतो आणि हर्टअ‍ॅटॅकची शक्यता वाढते.

११) हाडे कमकुवत होतात - प्रोसेस्ड फूटमध्ये फॉस्फेट असते, त्यामुळे तो पदार्थ चविस्ट होतो, पण हेच फॉस्फेट आपल्या हाडांना कमकुवत बनवते. सतत चॉकलेट, टॉफिज, गोड पदर्थ खाल्ल्यामुळे दातांचे कॅल्शियम कमी होऊन दात कमकुवत होतात आणि दातांचे वीकार जडतात. त्यामुळे मुलांना जंक फूडपासून परावृत्त करणे गरजेचे आहे.

मुलांना शाळेला डब्यात देण्यासाठी घरी तयार केलेली पोळी, भाजी, भात, भाकरी यासारखे पारंपरिक अन्नपदार्थ द्यावेत. डब्यात बिस्कीट, चीप्स, चिवडा इ.देवू नयेत. पालकांनी स्वतः जंक फूड खाण्यापासून दूर रहावे. शालेय अभ्यासक्रमात जंकफूडबाबत माहिती आणि त्यांच्या सेवनाचे दुष्परिणाम यांचा विज्ञान अथवा परिसर अभ्यास या पुस्तकात समावेश करणे गरजेचे आहे ज्यामुळे मुलांना जंक फूडचे दुष्परिणाम चांगले समजतील सोबतच सामाजिक माध्यमे, प्रसार माध्यमे, शाळा कॉलेज या मधून जनजागृती करणे गरजेचे आहे. तरच भारताची येणारी पिढी सुदृढ आणि निरोगी राहील.

प्र. शि. पाटील
अन्न सुरक्षा अधिकारी, नाशिक

मुलांना उपमा, पोहे, इडली, शिरा, थालीपीठ, उसळ, अंडी, डोसे, ताक, घरचा पुलाव, दही, भात, सोलकढी, लिंबू सरबत, फळांचे नैसर्गिक ज्यूस, कढी, याचा नाश्ता आणि भाजी, भाकरी, भाज्यांचे पराठे, भात, भरीत, वाफवलेली बट्टी, वेगवेगळ्या डाळीचे वरण, घरी केलेले मासाहारी पदार्थ हे पदार्थ खाण्यास प्रेरित करणे गरजेचे आहे.

# रक्षाबंधन : बहीणभावाचा सण



सौ. सीमा मंगरुळे
संपर्क क्र. 9075074994

आधुनिक केसरी

**बहिण भावाच्या पवित्र बंधनांचा हा सण,,बहिण भावाला ओवाळते आणि त्याच्या दिर्घायुष्यासाठी देवाकडे मागणे मागते. तसे पुरातन काळापासूनच बहिणीचे रक्षण करण्याचा अधिकार भावाकडे दिलेला आहे. द्रोपदीचे वस्त्रहरण होत असताना तीचे *लज्जा रक्षण करण्यासाठी धावून आलेला श्रीकृष्ण तिला वस्त्र पुरवत रहातो. आणि आपले भावाचे कर्तव्य तो पार पाडत असतो.**

श्रावण महिना सुरू झाला की सणांची रेलचेल सुरू असते. मुळात हा महिना धार्मिक म्हणून ओळखला जातो.
या महिन्यात उपासतापास , देवाला जाणे,तसेच सुट्यांचीही मांदियाळी असते.

आला सण रक्षाबंधनाचा
बहीणीच्या रक्षणाचा
मान मिळे भावाला
हा क्षण असे प्रेमाचा...

या महिन्यात महत्त्वाचा सण म्हणजे रक्षाबंधनचा. नवीन लग्न झालेल्या लेकी नुकत्याच पंचमीच्या सणाला माहेरी येऊन गेलेल्या असतात.आणि त्या वाट पाहात असतात,बहिण भावाच्या सण म्हणजे रक्षाबंधन

माझा बंधुराया
येईल ग घ्यायला
मायेचा धागा मी
बांधेन मी त्याजला...



बहिण भावाच्या पवित्र बंधनांचा हा सण,,बहिण भावाला ओवाळते आणि त्याच्या दिर्घायुष्यासाठी देवाकडे मागणे मागते. तसे पुरातन काळापासूनच बहिणीचे रक्षण करण्याचा अधिकार भावाकडे दिलेला आहे. द्रोपदीचे वस्त्रहरण होत असताना तीचे *लज्जा रक्षण करण्यासाठी धावून आलेला श्रीकृष्ण तिला वस्त्र पुरवत रहातो. आणि आपले भावाचे कर्तव्य तो पार पाडत असतो. बापु बिरु वाटेगावकर यांचे तर नाव यासाठी प्रकर्षाने घ्यावे लागेल आईबहिणींचा पाठीराखा होता.एखाद्या स्त्रीवर अन्याय, अत्याचार तो सहन करायचा नाही. तर तो अन्यायाविरुद्ध पेटून उठायचा.
अनेक खून त्याच्याकडून घडले.आणि तो सर्व महिलांचा भाऊ म्हणून प्रसिद्ध झाला.

सत्तु धर्माचा भाऊ माझा
आहे डोंगराचा राजा

हे गाण त्यावेळेस खूप प्रसिद्ध झाले भाऊ बहिणीच्या माया, प्रेम यावर अनेक चित्रपट निघाले....आणि खूप गाजलेही...
बहीण भावास राखी बांधते,आणि बहिणीचे रक्षण करण्याचे वचन मागते.
देशरक्षणासाठी सीमेवर लढणाऱ्या जवानांना सुद्धा देशातील भगीनी राखी बांधतात आणि त्यांच्याही जीवनात आनंद देण्याचा प्रयत्न करतात... आणि देशाचे रक्षण करताना कोणतेही संकट येऊ नये यासाठी देवाकडे त्यांच्या आयुष्यासाठी प्रार्थना करतात.
तर काही भगीनी अपंग ,अंध, अनाथाश्रम या ठिकाणी जाऊन तेथील मुलांना हौसेने राखी बांधून मुलांना खाऊ वाटतात...आणि त्यांच्या ही जीवनात आनंद वाटण्याचा प्रयत्न करतात.....
असा हा भाऊबहीणींचा नात्यांची छान गुंफण असणारा, आणि आईवडीलांच्या माघारी त्यांचे प्रेम देणारा लाडका भाऊराया....

असावा एक तरी भाऊ
आधार मिळे त्याचा
येऊदे कोणतीही संकटे
आशिर्वादाचा हात असे त्याचा

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त • पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत • सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीश देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला

३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट

गणिताच्या मूलभूत संकल्पना (१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त) MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/- पाने ५३४
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/- पाने ५३४
उखाण्यातून गणित मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/- पाने ३६४
श्रीमती छायाताई खेडकर 8888780568
श्री. हरिभाऊ गिते सर 9422742712
गणेश बुक स्टॉल, भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड मो. 8149196415
दत्तराज पार्क, बायपासरोड, सावतानगर, गेवराई मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट, मंगलमूर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ, धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# संजय गांधी व श्रावणबाळ योजनेसाठी कायमचा तहसिलदार नेमावा

## शिवसेना उपजिल्हाप्रमुख किरण जोंधळे यांच्या नेतृत्वात आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** कुटुंबाचे चरितार्थ चालविण्या शासनाकडून हातभार लागावा याकरीता संजय गांधी व श्रावण बाळ योजना कार्यरत आहे . या योजनेत धुळे ग्रामीण व शहरात सावळा गोंधळ उडाला असून या योजनेचा स्वतंत्र कारभार सुरु असताना देखील या विभागासाठी धुळे शहराला अद्यापही स्वतंत्र कार्यभार असलेला तहसिलदार मिळालेला नाही सतहसिलदारांची या ठिकाणाहून सतत अदलाबदली मुळे दररोज दाखल असंख्य प्रकरणे निर्णयाअभावी प्रलंबित आहेत . या विभागात काम करणाऱ्या तहसिलदारांच्या अकार्यक्षमतेमुळे एकूण दाखल प्रकरणात ८८२ प्रकरणे त्रुटीमुळे रद्द करण्यात आली . एकूण मंजुर १५०० प्रकरणांवर तहसिलदारांनी सह्या न केल्यामुळे प्रलंबित सन २०१९ , २०२० , २०२१ या तीनही वर्षातील दाखल प्रकरणे ऑनलाईन पोर्टलवरुन उडालेली असून यात ७००० दाखल प्रकरणे जुनी आहेत , ५००० प्रकरण उडाली आहेत . २००० प्रकरणांवर तहसिलदारांअभावीं निर्णय नाही . जुन्या ५००० ऑनलाईन उडालेल्या प्रकरणासंबंधात वंचितांना कुठलीही माहिती दिली गेलेली नाही किंवा त्यांना नव्याने प्रकरणे सादर करावीत असेही सांगण्यात आलेले नाही सदर विभागामार्फत वचितांना उडवाउडवीची उत्तरे दिली जात



असून विधवा व निराधार महिला या विभागाच्या कारभारामुळे मेताकुटीला आल्या आहेत . सदर लाभार्थींना न्याय देण्यासाठी त्यांचे पोर्टलवरुन उडालेले ५ हजार प्रकरणे शासनामार्फत नव्याने भरुन घेण्याकरीता उदासिनता दाखवित आहेत या संदर्भात आज शिवसेनेने जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच घेऊन निवेदन सादर करतांना संजय गांधी निराधार विभागाकरीता स्वतंत्र कायमस्वरूपी तहसिलदार नेमावा . २०१ ९ पासूनचे दाखल पण पोर्टलवरुन उडालेले सर्व प्रकरणे नव्याने दाखल करून घ्यावीत व प्रलंबीत प्रकरणे लवकरात लवकर मंजुर करुन वंचित , निराधार विधवा महिला भगिनींना न्याय द्यावा अशी मागणी केली . या प्रसंगी उपजिल्हा प्रमुख किरण जोंधळे सहसंपर्क प्रमुख महेश मिस्तरी , शिवसेना जिल्हा प्रमुख अतुल सोनवणे ,जिल्हा संघटक भगवान करनकाळ , मा . आ.प्रा . शरद पाटील , महानगरप्रमुख धीरज पाटील , डॉ . सुशील महाजन , शहर संघटक राजेश पटवारी , देविदास लोणारी , विधानसभा संघटक ललित माळी , शहर समन्वयक नितीन शिरसाठ , गुलाब माळी , भरत मोरे , महिला आघाडीच्या सौ . हेमाताई हेमाडे , डॉ . जयश्री वानखेडे , अरुणा मोरे , सुनिता शिरसाठ , पुष्पाताई बडगुजर , माजी जिल्हा प्रमुख भूपेंद्र लहामगे , माजी महानगरप्रमुख नरेंद्र परदेशी , चंद्रकांत गुरव , प्रफुल्ल पाटील , नगरसेविका सौ . ज्योत्स्ना पाटील , संदीप सूर्यवंशी , पुरुषोत्तम जाधव , रवि माळी , विनोद जगताप , सुनिल पाटील , रामदास कानकाटे , उपमहानगरप्रमुख शेखर वाघ , हा . रफिक पठाण , मच्छिंद्र निकम , संजय जवराज , प्रविण साळवे , संदीप चव्हाण , नंदलाल झुलपगारे , शरद गोसावी , भटू गवळी , आबा भडागे , पंकज भारस्कर , हेमंत बागुल आदी उपस्थित होते .

## पंकज भारसाखळे यांनी घेतली छत्रपती संभाजी राजेंची भेट



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** हिंदवी स्वराजाचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे १३ वे वंशज व राजश्री छत्रपती शाहू महाराज यांचे पणतू युवराज संभाजीराजे छत्रपती यांची क्रीडा भारतीचे पंकज भारसाखळे यांनी भेट घेतली. युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या पुढाकाराने सुरु असलेल्या गड किल्यांच्या पुर्नवसन व कोल्हापूरात राजे उभारत असलेल्या आंतराष्ट्रीय दर्जाचे हॉकीचे ऍस्ट्रो टुर्फ मैदान तसेच नवीन अद्यावत क्रीडा संकुलाच्या कामाबदल त्यांनी त्यांच्याशी चर्चा केली व त्यांना क्रीडा-भारतीच्या देशभर चालेल्या कामाबद्दल माहिती दिली. विशेष म्हणजे क्रीडा-भारती खेळाडूंचा मातांना "वीर माता जिजाऊ पुरस्कार" देऊन गौरव करीत असलेल्या उपक्रमाबदल एकूण त्यांना विशेष आनंद झाला व येणाऱ्या काळात या पुरस्कार वितरण समारंभात उपस्तिथ राहण्याचीही राजेंनी सहमती दर्शवली.

## विभागीय आयुक्त केंद्रेकर यांची पत्रकार संघाच्या स.मा.गर्गे भवनास भेट

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** येथील महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ च्या स.मा.गर्गे भवनास मराठवाडा विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनी बुधवारी भेट दिली. यावेळी जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा,जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार उपस्थित होते.स्वागत पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व संतोष मानुरकर यांनी केला.पत्रकार संघाच्या वतीने सुरू असलेल्या,अभ्यासिकासह इतर उपक्रमां बद्दल आयुक्तांनी समाधान व्यक्त केले.तर जिल्हाधिकारी असताना व बदली झाल्यानंतर पत्रकारांनी उभारलेले आंदोलन, सरकारला बदली आदेश मागे घ्यावा लागला,आजही बीडचे लोक किती प्रेम करतात याचा प्रत्यय येतो अशा अनेक आठवणी वर चर्चा झाली. यावेळी पत्रकार संघाचे विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, व्यापारी महासंघाचे संतोष सोहनी, सरपंच वैजनाथ तांदळे व पत्रकार, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## अंगणवाडी कर्मचारी पद भरतीचा विषय मार्गी लावा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अंगणवाडी कर्मचाऱ्यांची अनेक रिक्त जागेचा प्रश्न लगेच मार्गी लावा . विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू देवू नका . काही अंगणवाडींमध्ये विद्यार्थ्यांना शिकवायला नाही . पदभरतीचे काम पूर्ण करा . याकामाबाबत पुन्हा काहीच बोलायचं नाही नाही तर पुढील बैठकीला यायच नाही असा सज्जड़ दम जि.प. अध्यक्ष डॉ . तुषार रंधे यांनी महिला बालकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांना खूनातील भरला . जिल्हा परीषदेच्या स्व . यशवंतराव चव्हाण सभागृहात घेण्यात आलेल्या स्थायी समितीच्या सभेप्रसंगी अध्यक्ष डॉ . तुषार रंधे , अति . मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे , सभापती मंगलाताई पाटील , सभापती मोगरा पाडवी प्रकल्पाधिकारी प्रतिभा संगमनेरे उपस्थित होते . स्थायी समितीच्या सभेत एकूण पंधरा विषयांना मंजूरी देण्यात आली . धुळे तालुक्यातील दुसाणे येथे अंगणवाडी सेविकेचा अर्ज आला आहे . परंतू शाळा सोडल्याच्या दाखल्यावर अक्षरी आणि लिहीलेल्या जन्म तारखेत बदल असल्याने अर्ज थांबविण्यात आल्याचे महिला बालकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगताच जि.प. अध्यक्ष डॉ . रंधे यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले . अंगणवाडी पदभरतीचे काम ताबतोब पूर्ण करा , अन्यथा पुढच्या मिटींगला यायचं नाही असे खडसावून सांगितले. जि. प. सदस्य विरेंद्रसिंग गिरासे यांनी जिल्ह्यात गैरपध्दतीने टीईटी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किती शिक्षकांवर आता पर्यंत कारवाई करण्यात आली ? असा प्रश्न उपस्थित केला . त्यावर शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील शिक्षकांची यादी मागून कार्यवाहीची प्रक्रिया | पूर्ण केली जाईल असा खुलासा केला . मुख्याध्यापकाची तक्रारीची शिक्षण विभागाने दखल घेतली नाही म्हणून गिरासे यांनी स्वतः अति . मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांना मुख्याध्यापकांच्या तक्रारीचे निवेदन दिले .

**स्थायी समितीच्या सभेत डॉ. तुषार रंधे यांचे आवाहन**

## सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

### लैंगिक समस्या निदान व उपचार...

आधुनिक केसरी

**सीमेन ॲनालिसिस...**
जेव्हा पुरुष वंध्यत्व किंवा मेल इनफर्टिलिटी या विषयावर आपण बोलतो, तेव्हा पहिली टेस्ट येते ती म्हणजे 'सीमेन ॲनालिसिस'....

**सीमेन किंवा धातू म्हणजे काय ?**
पुरुषांमध्ये समागम झालयानंतर जो पांढरा पिवळसर द्रव पदार्थ बाहेर पडतो त्याला धातू किंवा सीमेन असे म्हणतात. सीमेन कशापासून बनते ? याचा बंध्यत्व किंवा मूल होण्याशी काय संबंध असतो ते आपण सविस्तर पाहूया ....

**सीमेनमध्ये काय घटक असतात ?**
यामध्ये समायनल वेसीकल, अंडाशय, प्रोस्टेट या तिन्ही ठिकाणांहून जो स्त्राव येतो त्यामुळे धातू बनतो. हे एक अत्यंत पोषक असे द्रव्य असते. जे शुक्राणूंना वाहून नेण्यास व त्यांचे पालन-पोषण करण्यास मदत करते. यामध्ये २०० प्रकारचे प्रोटीन्स, व्हिटॅमीनस, मिनरल्स, व्हिटॅमीन-सी, कॅल्शियम, क्लोरिन, सायट्रिक सिड, फ्रुक्टोज लॅक्टिक सिड, मॅग्नेशियम, नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम, सोडियम व्हिटॅमीन-बी 12 आणि झिंक इ. घटक असतात.
वीर्यस्खलन झाल्यावर २ ते ५ मिली सीमेन बाहेर येते. यात साधारणतः प्रति मिली १५ मिलियन ते २०० मिलियन शुक्राणूंची संख्या असते.
रीपोर्टमधील फिजिकल एक्झामिनिशेन, केमिकल एक्झामिनेशन आणि मायक्रोस्कोपिक एक्झामिनेशन याबद्दल पूर्ण माहिती दिलेली असते.
**फिजिकल एक्झामिनेशन** : यामध्ये त्यांचा रंग, पातळ होण्याची वेळ, त्याची घनता इ. पाहिले जाते.
**केमिकल एक्झामिनेशन :** या टेस्टमध्ये फ्रुक्टोज व पी. एच. पाहिले जाते.
**मायक्रोस्कोपिक एक्झामिनेशन** : या टेस्टमध्ये त्यांची संख्या व मोटिलिटी पाहिली जाते. नॉर्मल रिपोर्टमध्य पी. एच. अल्कलाईन (७.२ किंवा जास्त) काऊंट - १५ मिलियनपेक्षा जास्त, पूर्ण काऊंट ३९ मिलियन किंवा जास्त, आकार ४ टक्के नॉर्मल किंवा जास्त मोटिलिटी (फॉरवर्ड प्रोग्रेसिव्ह) ३२% किंवा जास्त, पूर्ण मोटिलिटी ४०% किंवा जास्त या सर्व गोष्टी नॉर्मल समजल्या जातात.

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

## छत्तीसगड-तेलंगणा राज्य महामार्गासह १७ मार्ग बंद

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** पुरामुळे सिरोंचा-हैद्राबाद तथा सिरोंचा-जगदलपूर या तेलंगणा व छत्तीसगड राज्य महामार्गासह १७ मार्ग पुरामुळे बंद आहेत. वैनगंगा, वर्धा, इंद्रावती, पर्लकोटा, गोदावरी या नदीचे पाणी दुथडी भरून वाहत असल्याने नदी नाल्यांना पूर आला आहे. त्यामुळे १७ मार्ग बंद आहेत. बंद मार्गांमध्ये आलापल्ली ताडगांव भामरागड (पर्लकोटा नदी, गुंडेनुर नाला, कुमरगुडा नाला, हेमलकसा नाला, कुडखेडी नाला, ताडगाव नाला, पेरमिली नाला), चातगांव कारवाफा पोटेगांव पावीमुरांडा घोट रस्ता (पोहार नदी पोटेगांव जवळ), सिरोंचा कालेश्वरम वारंगल हैद्राबाद रस्ता (गोदावरी नदीवरील मोठा पूल) , अहेरी बेजुरपल्ली परसेवाडा लंकाचेन रस्ता (लंकाचेन नाला ), गडचिरोली आरमोरी (पाल नदी गोगांवजवळ), निझमाबाद सिरोंचा जगदलपूर रस्ता (सोमनपल्ली नाला), गडचिरोली चामोर्शी (शिवनी नाला), आलापल्ली आष्टी गोंडपिपरी रस्ता (वैनगंगा नदी), कुरखेडा वैरागड रस्ता (सती नदी, मोहझरी लोकल नाला), अहेरी मोयाबीनपेठा वटरा रस्ता (वटरा नाला),भेंडाळा गणपूर बोरी अनखोडा रस्ता (हळदीमाला नाला, अनखोडा नाला), वडसा कोकडी पिंपळ गाव अरतोंडी आंधळी रस्ता या मार्गाचा समावेश आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in